RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❏ वर्ष - २ रे ❏ अंक -१६३ वा ❏ अमरावती (महाराष्ट्र) ❏ मंगळवार दि.२३ जुलै २०२४ ❏ संपादक - शुभांगी जोशी ❏ मुल्य - १ रु. ❏ पृष्ठ -६

# देशाचा अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांच्याकडून सादर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नवी दिल्ली**

एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प आज सादर झाला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी यंदा सलग सातव्यांदा अर्थसंकसल्प सादर केला. या अर्थसंल्पाता कुणाला काय मिळालं? कोणत्या विषयांत काय तरतुदी झाल्या, कोणत्या विषयांवर नवीन घोषणा झाल्या? तसंच, बजेटनंतर काय स्वस्त होणार आणि काय महाग होणार? कोणत्या राज्याला जास्त आणि कोणत्या राज्याला कमी? कशावर जास्त खर्च होणार? यासह सगळ्या प्रश्नांची उत्तर आपल्याला यामध्ये मिळणार आहेत.

सरकारकडून शेती, तसंच शेतीपुरक क्षेत्रासाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, असं निर्मला सीतारामन म्हणाल्या. केंद्र सरकारकडून २० लाख तरुणांना रोजगार देण्यासाठी प्रयत्न केला जाणार असल्याची माहिती निर्मला सीतारामन यांनी दिली. अर्थसंकल्पीय भाषणात अर्थमंत्र्यांनी उच्च शिक्षणासाठी १० लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी सरकारकडून आर्थिक मदत जाहीर केली. कर्मचाऱ्यांमध्ये महिलांचा सहभाग वाढवणं याला प्राधान्य असेल, अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी केली. वसतिगृह बांधण्यासाठी आणि महिलांसाठी विशेष कौशल्य कार्यक्रम आयोजित करण्यासाठी भागीदारी करून हे सुलभ केले जाईल असंही अर्थमंत्री सीतारामण म्हणाल्या आहेत.

**शेती –** कृषी व संलग्न क्षेत्रांसाठी १.५२ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून कृषीची विकासासाठी याचा मोठा फायदा होणार आहे. नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी आवश्यक ती पावलं सरकारकडून उचलली जाणार आहेत. आगामी वर्षात नैसर्गिक शेतीवर भर देण्याचा सरकारकडून घेण्यात आला आहे. पुढील काही वर्षात एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती करण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

**तरुणांसाठी –** पाच वर्षांच्या कालावधीसाठी दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या काळात ४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि इतर संधी उपलब्ध करून देण्यासाठी पंतप्रधान पॅकेज अंतर्गत पाच योजना आणि उपक्रम जाहीर करण्यात आली. तसेच सरकार १ कोटी तरुणांना मोठ्या ५०० कंपन्यांमध्ये इंटर्नशिप करण्याची संधी देणार आहे. यामध्ये प्रत्येक महिन्याला ६००० रुपयांच्या अतिरिक्त भत्त्यासह ५००० रुपये भत्ता दिला जाणार आहे. तसेच सर्व क्षेत्रांमध्ये पहिल्यांदा नोकरी मिळवणाऱ्यांना सरकार दोन वर्षांसाठी दरमहा ३०० रुपये अतिरिक्त पीएफ देणार आहे.

**महिलांसाठी –** यंदाच्या अर्थसंकल्पात महिलांसाठी भरीव अशी तरतूद करण्यात आली आहे. त्यामध्ये महिला आणि



मुलींना लाभ देणाऱ्या योजनांसाठी ३ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. इंडिया पोस्ट पेमेंट बँकेच्या १०० हून अधिक शाखा ईशान्येकडील भागात स्थापन केल्या जातील. नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे बांधली जाणार आहेत. त्याचबरोबर उत्पादन क्षेत्रातील एमएसएमईसाठी कर्ज हमी योजना सुरू केली जाईल, १०० कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी कोणतीही हमी आवश्यक नाही असे अर्थसंकल्पामध्ये निर्मला सीतारामन यांनी सांगितले.

**आरोग्य –** देशातील आरोग्य सेवा क्षेत्रासाठी ९० हजार १७१ कोटींची तरतूद करण्यात आली असून मागील वर्षाच्या तुलनेत साधारण १२ टक्क्यांची वाढ यात करण्यात आली आहे. देशाच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कॅन्सरवरील तीन औषधांचे मूलभूत सीमाशुल्क माफ केले असल्याने कर्करोग रुग्णांना दिलासा मिळाला आहे. भारतात कर्करोगाचं प्रमाण वाढत असताना अर्थसंकल्पातील सीमाशुल्कात माफी मिळाल्याने कॅन्सरची औषधे स्वस्त होणार असून कर्करोग रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

**आयकर –** या 'न्यू टॅक्स रेजीम' म्हणजे नवीन कर प्रणालीत सर्वांनाच म्हणजे वैयक्तिक करदाते, सिनीअर सिटीझन्स – ज्येष्ठ नागरिक, सुपर सिनियर सिटीझन्स – अति ज्येष्ठ या सगळ्यांसाठी एकच कररचना आहे. तसंच, जुन्या कर प्रणालीमध्ये कोणताही बदल करण्यात आला नाही. ती खालीलप्रमाणे असणार आहे. ही प्रणाली २०२५ पर्यंत उपलब्ध राहणार आहे. त्यानंतर सर्व करदात्यांनी नवीन कर प्रणालीप्रमाणे कर भरावा लागणार आहे.

**रेल्वे –** रेल्वेसाठी अर्थमंत्र्यांनी २,५२, ००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. गेल्या पाच वर्षात रेल्वेवरील खर्चामध्ये ७७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. नवीन लाईन बांधणी मोठ्या प्रमाणात करण्यात आली आहे. आंध्र प्रदेशमध्ये रेल्वे बांधणीसाठी मदत केले जाईल असं अर्थमंत्री म्हणाल्यात.मार्ज २०२४ पर्यंत ५१ वंदे भारत ट्रेन ताफ्यात दाखल झाल्या आहेत. वंदे भारत रेल्वेमध्ये अनेक आधुनिक सुविधा आहेत. पण, यात आणखी वाढ करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. यात ऑटोमॅटिक स्लाईडिंग डोर, सीसीटीव्ही, रुट मॅप इंडिकेटर, प्रवाशांची माहिती, फायर डिटेक्शन सिस्टिम असे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणले जाणार आहे. २०२५ पर्यंत तंत्रज्ञानाने युक्त नव्या वंदे भारत ट्रेन दाखल होऊ शकतात.

**शहरी भाग –** ३० लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शंभर मोठ्या शहरांमध्ये मुलभूत सुविधांसाठी विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये पाणीपुरवठा आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांचा समावेश आहे. शहरी विकासाच्या योजनांचा लाभ १ कोटी मध्यमवर्गीय कुटुंबियांना होणार आहे. यासह निवडक शहरांमध्ये स्ट्रीट फूड हब उभे केले जाणार आहेत. यामध्ये पायाभूत सुविधांच्या विकासावर मोदी सरकारने भर दिला असून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी तब्बत ११ लाख कोटी रुपये देण्यात येणार आहेत. जीडीपीच्या ३.४ टक्के खर्च पायाभूत सुविधांवर होणार आहे.

**स्टॅम्प ड्युटी –** काही राज्यांमध्ये नोंदणीकृत मालमत्तेच्या मूल्यावर आधारित मुद्रांक शुल्काचा सपाट दर असतो, तर काही राज्यांमध्ये स्लॅब यंत्रणेवर काम करणारे दर असतात ज्यात खरेदी केल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या मूल्यानुसार दर वाढतात. अनेक ईशान्येकडील राज्ये आणि काही डोंगरी राज्ये तुलनेने जास्त मुद्रांक शुल्क आकारतात. हे आठ-नऊ टक्क्यांच्या मर्यादेत आहे, तर महाराष्ट्रासारख्या प्रमुख गृहनिर्माण बाजारांमध्ये सुमारे सहा टक्के शुल्क आकारले जाते. ते आता २० लाख रुपये करण्यात आलं आहे.

# अर्थसंकल्पात मोठ्या घोषणा, काय स्वस्त अन् काय महाग?; जाणून घ्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३नवी दिल्ली**

एनडीए सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला बजेट आज सादर होत आहे. त्यात विविध क्षेत्रांसाठी सरकारने अनेक घोषणा केल्या आहेत. परंतु सर्वसामान्य लोकांच्या खिशावर कुठला बोझा पडला आहे, कोणत्या घोषणा झाल्याने दिलासा मिळाला आहे हे जाणून घेण्याची उत्सुकता सगळ्यांची असते. सरकारने अनेक गोष्टींवरील कस्टम ड्युटी दर कमी केले आहेत. त्यात प्रामुख्याने कॅन्सरच्या औषधांवरील शुल्क मुक्त करण्यात आले आहे. २५ आवश्यक खनिजांवरील सीमा शुल्क हटवले आहेत.



**सरकारच्या घोषणांमुळे या गोष्टी स्वस्त**

सोने-चांदी खरेदी, प्लॅटिनमवरील कस्टम ड्युटीत घट, कॅन्सरची औषधे, मोबाईल, चार्जर, चामड्यापासून बनवलेल्या वस्तू, रसायन पेट्रोकेमिकल, पीवीसी फ्लेक्स बॅनर, एक्सरे ट्यूब आणि फ्लॅट पॅनेल डिटेक्टर, सोलर सेल आणि पॅनेल उत्पादनाच्या वस्तू

**काय महाग?**

प्लास्टिकच्या वस्तू, पेट्रोकेमिकल - अमोनियम नायट्रेट, पीव्हीसी, हवाई प्रवास, सिगारेट

**सोने-चांदीच्या दरात घट**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी बजेटमध्ये मोठ्या घोषणा केल्यानं कॅन्सरवरील औषधं स्वस्त झाली आहेत. मोबाईल चार्जरसह अन्य उपकरणावर कर १५ टक्के घट केला आहे. त्याशिवाय सोने, चांदी यांच्यावरील कस्टम ड्युटी कमी करून ती ६ टक्के केली आहे. त्यामुळे सोने चांदी यांच्या किंमतीत घट होणार आहे. त्याशिवाय सरकारने चामड्याच्या वस्तू आणि फुटवेअरवरील कस्टम ड्युटीत घट केली आहे. तसेच सरकारने पोलाद आणि तांब्यावरील मूळ कस्टम ड्युटी कमी केली आहे.

**१ कोटी युवकांना दरमहिना ५ हजार भत्ता**

देशातील टॉप कंपन्यांमध्ये युवकांना प्रशिक्षण दिलं जाईल. ज्यातून दर महिना युवकांना ५ हजार रुपये मासिक भत्ता दिला जाईल. हा मासिक भत्ता पंतप्रधान इंटर्नशिप योजनेतंर्गत १२ महिन्यांपर्यंत असेल. युवकांना १२ महिने कंपन्यात इंटर्नशिप मिळेल. पुढील ५ वर्षात देशातील टॉप कंपन्यांमध्ये १ कोटी युवकांना प्रशिक्षण दिले जाईल अशी घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे.

**मुद्रा योजनेतून आता २० लाख कर्ज**

देशातील युवकांना रोजगार-स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करण्यास मुद्रा योजना राबवली जाते. या योजनेतून युवकांना १० लाखापर्यंत कर्ज देण्यात येत होते. आता त्यात वाढ करून २० लाखांपर्यंत कर्ज दिले जाणार आहे. हे कर्ज सहज आणि अल्प व्याजदरात मिळते. जर वेळेआधीच कर्जाची परतफेड केली तर कर्जावरील व्याजदरही माफ केले जाते. ज्या लोकांनी त्यांचं जुनं कर्ज फेडलं असेल अशांना आता दुप्पट कर्ज उपलब्ध करून दिलं जाणार आहे.

# वार्षिक उत्पन्न ₹ ७.७५ लाख, एक रुपयाही कर भरावा लागणार नाही; करदात्यांना दिलासा

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २३ नवी दिल्ली**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज(दि.२३) देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात सरकारने नवीन कर प्रणाली अंतर्गत टॅक्स स्लॅबमध्ये मोठे बदल केले आहेत. यात स्टँडर्ड डिडक्शनची मर्यादाही वाढवण्यात आली आहे. स्टँडर्ड डिडक्शन आता वार्षिक ५०,००० रुपयांवरुन ७५,००० रुपये प्रतिवर्ष करण्यात आले आहे. सध्या नवीन कर प्रणालीमध्ये ७ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर कुठलाही कर लागत नाही.



एखाद्याचे वार्षिक उत्पन्न ७,७५,००० रुपये असेल आणि त्याने नवीन कर व्यवस्था निवडली, तर आता त्याला एक रुपयाही कर भरावा लागणार नाही. याचे कारण म्हणजे, स्टँडर्ड डिडक्शन वार्षिक ७५००० रुपये करण्यात आले आहे. यापूर्वी हे ५० हजार रुपये होते. म्हणजेच याआधी ७.५० लाख रुपयांच्या वार्षिक उत्पन्नावर कोणताही कर भरावा लागत नव्हता. आता ही सूट वार्षिक २५,००० रुपयांनी वाढून ७.७५ लाख रुपये झाली आहे.

**पगार ७.७५ लाखांपेक्षा जास्त असल्यास किती कर भरावा लागेल?**

एखाद्या व्यक्तीचे वेतन किंवा वार्षिक उत्पन्न ७.७५ लाख रुपयांपेक्षा जास्त असेल आणि त्याने नवीन कर व्यवस्था निवडली, तर त्याला सुधारित कर स्लॅबनुसार १०% कर भरावा लागेल. तर, नवीन टॅक्स स्लॅबनुसार, जर एखाद्याचे उत्पन्न ७ लाखांपेक्षा जास्त अन् १० लाख रुपयांपेक्षा कमी असेल, तर त्याला १०% कर भरावा लागेल. उत्पन्न १० लाख रुपयांपेक्षा जास्त अन् १२ लाखांपेक्षा कमी असेल, तर १५ टक्के कर भरावा लागेल.

**१२ ते १५ लाख रुपयांवर किती कर?**

जर करदात्याने वार्षिक १२ लाख रुपयांपेक्षा जास्त कमाई केली आणि नवीन कर प्रणाली निवडली, तर त्याला २०% कर भरावा लागेल. तसेच, एखाद्याचे उत्पन्न १५ लाखांपेक्षा जास्त असल्यास ३० टक्के कर भरावा लागेल.

# अर्थसंकल्पात विकसित भारताचा पाया; समाजातील प्रत्येक घटकाला बळ मिळणार - पीएम मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ नवी दिल्ली**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज(दि.२३) देशाचा अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पावर विरोधक टीका करत आहेत, तर एमडीएतील नेत्यांकडून अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यात येत आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अर्थसंकल्पाचे वर्णन मध्यमवर्गाला बळ देणारा अर्थसंकल्प, असे केले आहे. तसेच, आजचा अर्थसंकल्प भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक शक्ती बनविण्याच्या प्रक्रियेत मुख्य स्रोत म्हणून काम करेल आणि विकसित भारताचा भक्कम पाया घालेल, असेही ते म्हणाले.



हा अर्थसंकल्प देशातील हजारो खेड्यांना, गरीबांना, शेतकऱ्यांना समृद्धीच्या मार्गावर घेऊन जाणार आहे. गेल्या १० वर्षात २५ कोटी लोक गरिबीतून बाहेर आले. समाजातील प्रत्येक घटकाला बळ देणारा, दलित आणि मागासलेल्या लोकांना बळ देणारा, तरुणांना असंख्य नवीन संधी उपलब्ध करून देणारा, असा हा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पामुळे शिक्षण आणि कौशल्ये नवीन उंची गाठतील. या अर्थसंकल्पामुळे छोटे व्यापारी आणि एमएसएमईंना प्रगतीचा नवा मार्ग मिळेल. महिलांचा आर्थिक सहभाग सुनिश्चित होण्यास मदत होईल, अशी प्रतिक्रिया नरेंद्र मोदी यांनी दिली.

# महाराष्ट्रातील जनता स्वाभिमानी आहे म्हणून ही वागणूक?; आदित्य ठाकरे बरसले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३मुंबई**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पानंतर राज्यात संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. सत्ताधाऱ्यांकडून या अर्थसंकल्पाचं कौतुक केलं जात असून विरोधकांकडून मात्र टीकेचे बाण सोडले जात आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी या अर्थसंकल्पात महाराष्ट्राची उपेक्षा करण्यात आली असल्याचं सांगत सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. आजच्या भाजपप्रणित केंद्र सरकारच्या बजेटमध्ये महाराष्ट्राचा साधा उल्लेखही केला गेल्याचं दिसलं नाही, असं म्हणत आदित्य ठाकरेंनी आपली नाराजी व्यक्त केली आहे.




सरकारवर हल्लाबोल करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, महाराष्ट्राला ही वागणूक का? महाराष्ट्राने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या संविधानाचा आदर राखत तुमच्या संविधानविरोधी सत्तेला आळा घातला म्हणून? की महाराष्ट्राची जनता अजूनही स्वाभिमानी आहे म्हणून? की महाराष्ट्रवर यांचा जुना आकस आहे म्हणून? असं म्हणत आदित्य ठाकरे यांनी सरकारवर प्रश्नांची सरबत्ती केली आहे.

दरम्यान, आजच्या अर्थसंकल्पात बिहार आणि आंध्र प्रदेश या एनडीच्या घटकपक्षांची सत्ता असणाऱ्या राज्यांसाठी मोठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. याबाबत बोलताना आदित्य ठाकरेंनी म्हटलं की, बिहार आणि आंध्र प्रदेशला त्यांचा वाटा नक्की द्या, पण महाराष्ट्र सर्वात मोठा करदाता असूनही भाजपाचा महाराष्ट्रावर एवढा राग कशासाठी? असा सवाल आदित्य यांनी केला आहे.

# महाराष्ट्राला अनेक गोष्टी मिळाल्या आहे विरोधकांनी राजकारण करू नये: देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२३ मुंबई**

विनाकारण नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न होतो, ते तुमच्या समोर आहे. माझा विरोधकांना सल्ला आहे की, फक्त नरेटिव्ह सेट करण्यासाठी राजकारण करू नका. महाराष्ट्राला देखील अनेक गोष्टी मिळाल्या आहे. मध्यमवर्गाला फायदा देत भविष्याचा वेध घेणारा अर्थसंकल्प आहे, या शब्दांत महाराष्ट्राचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत केले आहे.



केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी देशाचा अर्थसंकल्प सादर केला. यामध्ये विद्यार्थी वर्ग, तरुण, शेतकरी, महिला, स्टार्टअप यांसाठी अनेकविध योजना घोषित केल्या. तसेच काही गोष्टी स्वस्त झाल्या आहेत. कररचनेत बदल करण्यात आला आहे. बिहार आणि आंध्र प्रदेश या राज्यांसाठी विशेष तसेच मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. या अर्थसंकल्पावरून आता संमिश्र प्रतिक्रिया येत आहेत. विरोधकांकडून या अर्थसंकल्पावर टीका करण्यात येत असून, एनडीएतील पक्षांकडून या अर्थसंकल्पाचे स्वागत करण्यात येत आहे. विरोधकांकडून होत असलेल्या टीकेचा देवेंद्र फडणवीस यांनी खरपूस शब्दांत समाचार घेतला. शेतकऱ्यांसाठी नवीन योजना जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या धर्तीवर केंद्र सरकारने अप्रेंटिशिप स्कीमची योजना घोषणा केली. रोजगाराची निर्मिती मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. ग्रामविकास क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्यात येणार आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## संपादकीय ......

# संरक्षण निर्यातीतील भरारी

भारताचे एकूण वार्षिक संरक्षण उत्पादन २०२३-२४ मध्ये १.३ लाख कोटी रुपयांच्या पातळीवर पोहोचले असून हा एक विक्रम आहे. २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या तुलनेत गेल्या वर्षी १६.७ टक्के अधिक उत्पादन झाले. यावर प्रकाश टाकताना संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 'मेक इन इंडिया' मोहीम वर्षानुवर्षे नवनवीन टप्पे ओलांडत असल्याचे बरोबरच म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाचे आणि देशाला स्वावलंबी बनविण्याच्या प्रयत्नांचे सकारात्मक परिणाम अनेक क्षेत्रांत दिसून येत असले, तरी संरक्षण उत्पादन आणि निर्यातीत लक्षणीय वाढ होण्याला विशेष महत्त्व आहे.

भारत हा वर्षानुवर्षांपासून संरक्षण गरजांसाठी आयातीवर अवलंबून असणारा आणि आशिया खंडातील एक प्रमुख आयातदार देश म्हणून ओळखला जात होता. गेल्या काही वर्षांपासून भारत सरकारने अशी तरतूद केली आहे की, आपली सैन्यदले स्वदेशी संरक्षणस सामग्रीची खरेदी करताहेत. या वस्तूंची यादी सतत वाढत आहे. आज अत्याधुनिक युद्ध नौका आणि पाणबुड्याही भारतात तयार होत आहेत. त्यांची निर्मिती करण्याची क्षमता काही देशांकडेच होती; पण आज भारत त्या देशांच्या पंक्तीत सहभागी झाला आहे. आयात घटल्याने आणि निर्यातीत वाढ झाल्यामुळे व्यापारी तूट कमी होत असून संरक्षण उद्योगाचे उत्पन्न वाढत आहे. भू-राजकीय परिस्थिती आणि तंत्रज्ञानाबाबत विविध देशांच्या संरक्षणवादी धोरणांचाही शस्त्रांच्या पुरवठ्यावर प्रभाव पडतो. तथापि, देशातील उत्पादनात वाढ झाल्यामुळे असे दबावही कमी होत आहेत. दुसरीकडे ज्या देशांना भारताकडून संरक्षण उत्पादने विकली जात आहेत त्यांच्याशी धोरणात्मक संबंधही सुधारत आहेत. यामुळे जागतिक स्तरावर भारताचा प्रभाव वाढण्यास मदत होत आहे.

संरक्षण निर्यातीतील वाढ हेही सूचित करते की, भारतीय उत्पादनांच्या गुणवत्तेवर आंतरराष्ट्रीय विश्वास वाढत आहे. भारताकडून संरक्षण साधनसामग्रीची आयात करणार्या देशांमध्ये अमेरिका, ब्रिटन, इस्रायल, फ्रान्स, जर्मनी, संयुक्त अरब अमिराती, नेदरलँड, सौदी अरेबिया आदी देशांचा समावेश आहे. यातील अनेक देश विकसित अर्थव्यवस्था आहेत आणि संरक्षण उत्पादनात आघाडीवर आहेत, तरीही गेल्या आर्थिक वर्षांत एकूण उत्पादनापैकी ७९ टक्के उत्पादन (मूल्याच्या दृष्टीने) सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांनी केले आणि उर्वरित योगदान खासगी क्षेत्राने केले. यावरून हे स्पष्ट होते की, सरकारी आणि खासगी अशा दोन्ही क्षेत्रांत विस्तार होत आहे. संरक्षण उत्पादनात खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासह विविध सुधारणांचे परिणाम उत्साहवर्धक आहेत. २०२३-२४ मध्ये संरक्षण निर्यात २१,०८३ कोटी रुपये होती, जी अभूतपूर्व आहे. २०२२-२३ मध्ये हा आकडा १५,९२० कोटी रुपये होता. संरक्षण उत्पादन आणि निर्यातीतील वाढीचा वेग कायम राहण्याची शक्यता आहे, याचे संकेत आपल्याला शेअर बाजारातील संबंधित कंपन्यांच्या कामगिरीवरून मिळतात. त्याला एक भक्कम पाया देण्यासाठी, संशोधन आणि विकासाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे जेणेकरून आपण अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपकरणांचे उत्पादन वाढवू शकू.भारताच्या आर्थिक विकासामध्ये आणि जीडीपीवृद्धीमध्ये दोन महत्त्वाच्या घटकांवर लक्ष केंद्रित केले जात आहे. एक म्हणजे देशाची आयात कमी करून परकीय चलनसाठ्यावर येणारा ताण कमी कसा करता येईल आणि दुसरी गोष्ट म्हणजे निर्यातीला चालना देऊन जास्तीत जास्त परकीय चलन मिळवतानाच देशातील उद्योगधंद्यांचे उत्पन्न वाढून रोजगारनिर्मितीला कशा प्रकारे चालना मिळेल? संरक्षण क्षेत्राचा विचार करता अब्जावधी डॉलर्सच्या संरक्षण साहित्यासाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी चलन खर्ची पडत असल्याने आर्थिक तूट वाढण्यावर याचा प्रतिकूल परिणाम होतो; पण आता आयात कमी करून निर्यातीत वाढ करण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नांना यश येत असल्याने याचे दूरगामी फायदे मोठे आहेत.

# राज्यात ९१ टक्के पेरण्या पूर्ण

## सोयाबीन वाढले तर कापसाचे क्षेत्र घटले,

## पावसामुळे भात लावण्यांना वेग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-** राज्यात गेल्या महिन्यात सर्वदूर झालेल्या पावसामुळे खरिपाच्या पेरण्यांना वेळेत सुरुवात झाली. मात्र, कोकण आणि पूर्व विदर्भात पुरेसा पाऊस नसल्याने भात लावण्यांना उशीर झाला होता. सध्या पूर्व विदर्भ आणि कोकणात सर्वदूर होत असलेल्या मुसळधार पावसामुळे भात लावण्यांच्या कामांना वेग आला असून राज्यात आतापर्यंत एकूण ९०.७९ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. राज्यात खरिपाचे सरासरी क्षेत्र १ कोटी ४२ लाख हेक्टर असून आतापर्यंत १ कोटी २८ लाख ९४ हजार हेक्टरवर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. गेल्या वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण ११३ टक्के इतके आहे. राज्यात सर्वाधिक ४८ लाख ५ हजार हेक्टर अर्थात सरासरीच्या ११६ टक्के सोयाबीनच्या पेरण्या झाल्या आहेत. तर कापूस पिकाची ३९ लाख ८४ हजार १२७ हेक्टरवर पेरणी झाली आहे.



यंदा मॉन्सूनने वेळेत हजेरी लावल्यामुळे खरिपातील उडीद, मूग तसेच कापूस व सोयाबीन या महत्त्वाच्या पिकांच्या पेरण्या वेळेत झाल्या. मात्र, कोकण तसेच पूर्व विदर्भात पुरेसा पाऊस न झाल्याने भाताची लावणी वेळेत होऊ शकली नाही. गेल्या पंधरवड्यापासून या दोन्ही विभागांत होत असलेल्या पावसामुळे भाताची ४२ टक्के लावणी पूर्ण झाली आहे. परिणामी राज्यात एकूण १ कोटी २८ लाख ९४ हजार ४४६ हेक्टर अर्थात ९०.७९ टक्क्यांवर पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. गेल्या वर्षाच्या पेरण्यांच्या तुलनेत हे प्रमाण ११३ टक्के इतके आहे.

राज्यात सोयाबीनचे सरासरी क्षेत्र ४१ लाख ४९ हजार ९१२ हेक्टर इतके असून आतापर्यंत ४८ लाख ५ हजार ९९७ अर्थात ११६ टक्के पेरणी झाली आहे. मात्र, कापूस पिकाच्या सरासरी क्षेत्रात काहीशी घट झाल्याचे दिसून येत आहे. राज्यात सरासरी ४२ लाख १ हजार १२८ हेक्टरवर कापसाची पेरणी केली जाते. तर आतापर्यंत ३९ लाख ८४ हजार १२७ हेक्टर अर्थात ९५ टक्के क्षेत्रावर कापसाची पेरणी झाली आहे. भाताचे सरासरी क्षेत्र १५ लाख ८ हजार ३७४ हेक्टर असून आतापर्यंत ६ लाख ३१ हजार ८८७ हेक्टर अर्थात ४२ टक्क्यांवर लावणी झाली आहे.

बाजरी पिकाची सरासरी ६ लाख ६९ हजार ८९ हेक्टरवर पेरणी होत असते त्या तुलनेत आतापर्यंत ३ लाख ८० हजार ८४३ अर्थात ५७ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. तर सरासरी तूर लागवड १२ लाख ९५ हजार ५१६ हेक्टर असून आतापर्यंत ११ लाख ६ हजार अर्थात ९० टक्के तुरीच्या पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. मुगाच्या २ लाख २१ हजार ९६१ हेक्टर अर्थात ५६ टक्के पेरण्या पूर्ण झाल्या आहेत. यंदा उडीदाच्या पेरण्या ९३ टक्के अर्थात ३ लाख ४४ हजार ६९१ हेक्टर झाल्या आहेत.

# खताच्या अतिवापराने पिकात होऊ शकतो रोग, किडींचा प्रादुर्भाव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती-** युरिया हे कृत्रिम नत्रयुक्त खत आहे. यामध्ये ४६ टक्के अमाईड नत्र असते. याला शेहचाळीस-शून्य-शून्य (४६-०-०) असेही म्हणतात. खत पाण्यात पूर्णपणे विरघळणारे असते. खत आम्लधर्मीय आहे. युरियामध्ये २०.६ टक्के ऑक्सिजन, २० टक्के कार्बन, ७ टक्के हायड्रोजन, १ ते १.५ टक्का बाययुरेट हे उपघटक असतात.

दमट हवामानात आर्द्रता शोधून घेतल्यामुळे खताचे खडे होतात. अन्य खतांत मिसळताना पाणी सुटणार नाही याची खात्री घ्यावी. नत्राचे अमाईड रूपांतर युरीयेज विकारामुळे अमोनियात होऊन नंतर ते नाइट्रेट स्वरूपात होते.

### युरियाचा वापर आणि त्याचे परिणाम

- केवळ नत्रयुक्त खतांचा वापर केला तर पिकांची फक्त शाकीय वाढ होते.

- रोग, किडीचा प्रादुर्भाव वाढतो. उत्पादनात घट येते.

- पिकांमध्ये लुसलुशीतपणा राहून खोड नाजूक राहते, पीक लोळते. पिकांचा कालावधी वाढतो.

- युरिया खताच्या अवाजवी वापरामुळे जमिनीच्या आरोग्यावर परिणाम होतो. जमिनीतील कर्ब, नत्र यांचे गुणोत्तर कमी होऊन सूक्ष्म जिवाणूंची संख्या कमी होते.

- पालाश, कॅल्शिअम, बोरॉन, तांबे या अन्नद्रव्यांची कमतरता भासते.

- जमिनीमध्ये अमोनिया वायू जास्त प्रमाणात तयार होऊन नायट्रोबॅक्टरसारख्या जिवाणूच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतो.

- गांडुळांच्या संख्येवर परिणाम होतो. जमिनीच्या जडणघडणीवर परिणाम होतो.

- युरिया खताच्या अवाजवी वापरामुळे भूगर्भातील पाण्याच्या प्रतीवर परिणाम होतो पाण्यातील नायट्रेटचे प्रमाण वाढते (१० पीपीएम), जलचर प्राण्यांची हानी होते.

- पाण्यातील शेवाळ आणि पानवनस्पतींची वाढ होते.

- विना निमकोटेड युरिया वापरल्याने त्याचा पाण्याबरोबर संपर्क होताच तो लगेच विरघळतो. त्यातील नत्र पिकांना उपलब्ध होण्याची क्रिया तत्काळ सुरू होऊन काही प्रमाणात पाण्याबरोबर जमिनीत वाहून जातो, त्यामुळे जमिनीतील पाणी दूषित होते या संपूर्ण प्रक्रियेद्वारे नायट्रस ऑक्साइड हा हरितगृह वायू तयार होतो. त्यामुळे वातावरणातील हवा दूषित होते.




### युरियाचा अतिवापर नाही बरा

- खते देण्यापूर्वी माती परीक्षण करावे. या अहवालानुसार खते द्यावीत.

- नत्रयुक्त खतांचा सेंद्रिय खतांबरोबर वापर करावा.

- हिरवळीच्या खतांचा वापर करावा.

- नत्रयुक्त खते पेरणीच्या वेळी फेकून न देता, दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावे.

- कालावधी कमी असल्याने नत्र खताची मात्रा विभागून द्यावी.

- एक किलो नत्र देण्यासाठी २.१७ किलो युरिया द्यावा.

- युरियाचा वापर कमी करण्यासाठी तृणधान्य पिकांना झोटोबॅक्टर/सिटोबॅक्टर जिवाणू संवर्धक आणि द्विदल पिकांना रायझोबियम या जिवाणू संवर्धकाची २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाणे या प्रमाणे पेरणीपूर्वी प्रक्रिया करावी जिवाणू खताच्या वापरामुळे तृणधान्य, द्विदल पिके व भाजीपाला पिकांमध्ये १५ ते २० टक्के नत्राची बचत होते. उसामध्ये ५० टक्क्यांपर्यंत बचत होते.

- भातामध्ये युरिया डीएपी ब्रिकेटचा वापर करावा.

- पाणथळ जमिनीत प्रामुख्याने अमोनियाधारक नत्रयुक्त खतांचा वापर करावा.

- कोरडवाहू शेतीमध्ये नत्रयुक्त खते पेरणीच्या वेळेस पेरून द्यावीत.

- ऊस, केळी, बीटी कापूस यांसारख्या दीर्घ मुदतीच्या पिकांना युरिया खताची मात्रा विभागून द्यावी.

- नायट्रेटयुक्त खते वाहून जाऊ नयेत म्हणून नियंत्रित आणि हलकी ओलिताची पाळी द्यावी. चोपणयुक्त जमिनीत युरिया हे शेणखत, कंपोस्ट खत किंवा गांडूळ खताबरोबरच द्यावे. युरिया खताची मात्रा २५ टक्क्यांनी वाढवून द्यावी.

- राज्यातील ५२ टक्के जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे. अशा जमिनीत युरियाला पर्यायी अमोनिअम सल्फेटचा वापर केल्यावर पिकांना नत्राबरोबर गंधक हे अतिरिक्त अन्नद्रव्य मिळून त्याचे चांगले परिणाम दिसतात.

- युरिया फेकून किंवा पेरून देण्यापेक्षा पाण्यात मिसळून फवारणीद्वारे दिला तर अत्यंत कमी खतामध्ये चांगले परिणाम दिसतात.

- युरियाला पर्याय म्हणून काही नत्रयुक्त विद्राव्य खते बाजारात उपलब्ध आहे, देशात उत्पादित होणारा आणि आयातीत युरिया सर्व उत्पादक व पुरवठादार यांना नीम कोटिंग करूनच पुरवठा व विक्री करणे बंधनकारक आहे.




## धोका बुरशीजन्य आजारांचा

***विदर्भ प्रजासत्ताक***
***दि.२३अमरावती -*** *पावसाळा म्हटलं की, विविध ाजारांचे प्रमाण वाढते त्यातही जीवाणूजन्य, बुरशीजन्य आजारांचे प्रमाण अधिक असते. बुरशीजन्य संसर्ग हा पायांची बोटे, कंबर, मांड्या तसेच डोळ्यांवरही परिणाम करतो. त्यामुळे खाज येण्यापासून ते व्हजायनल यीस्ट म्हणजे योनीमार्गातला संसर्ग तसेच त्वचारोग होण्याचा धोका वाढतो.*



***अ‍ॅथलिट फूट :*** *हा एक अत्यंत सर्वसाधारणपणे आढळणारा बुरशीजन्य संसर्ग आहे. जो पायाच्या त्वचेला होतो. विशेषतः पायाच्या बोटांच्या बेचक्यांमध्ये हा संसर्ग होतो. पावसाळ्यात सतत बूट घालत असाल, तर पाय ओलसर राहतात. अनेकदा घाम व पावसाळ्याचे पाणी यांच्या एकत्रित संपर्कामुळे हा संसर्ग होण्याची शक्यता असते.*

***इसब :*** *बुरशीमुळे त्वचेला होणारा गंभीर संसर्ग म्हणजे इसब. त्यामध्ये त्वचेवर गोलाकार, लाल आणि खाज येणारे डाग पडतात. शरीराच्या इतर भागांवरही हे होऊ शकतात. हा संसर्गजन्य आजार आहे.*

***जॉक इच आणि फंगल केराटायटिस :*** *हे दोन्हीही बुरशीजन्य आजार आहेत. जॉक इचमध्ये जांघेत खाज येते. यामध्ये कंबर, मांड्या आणि नितंबांवर बुरशीजन्य संसर्ग दिसून येतो. यात त्वचेला खाज येणे, ती लालसर होणे आणि पुरळ येणे अशी बाह्य लक्षणे दिसतात. तर फंगल केराटायटिसमध्ये डोळ्याच्या कॉर्नियावर परिणाम होतो. वेळीच उपचार न केल्यास दृष्टीसंबंधी समस्या निर्माण होऊ शकतात.*

***नखांमध्ये संसर्ग :*** *याला ओनिको माइकोसिस असे म्हणतात. पावसाळ्यात नखांत संसर्ग होण्याचा धोका वाढतो. सर्वसाधारणपणे पायांच्या बोटांमध्ये, नखांमध्ये हा संसर्ग होतो. त्यामुळे नखे जाड होणे, त्यांचा रंग खराब होणे आणि नखे तुटणे, असे त्रास होतात.*

***कैंडिडीओसिस :*** *कैंडिडा बुरशीमुळे निर्माण होणारी आरोग्यस्थिती म्हणजे हा संसर्ग. एकप्रकाराच्या बुरशीचा हा संसर्ग असतो. शरीराच्या विविध भागांवर त्याचा परिणाम होतो. सर्वसाधारणतः चेहरा, संवेदनशील शरीरभाग, योनी मार्ग या संसर्गामुळे प्रभावित होण्याची शक्यता असते.*

***ॲस्परगिलोसिस :*** *कवक प्रकार च्या बुरशीमुळे होणारा हा संसर्ग आहे. ज्यांची प्रतिकारक्षमता कमजोर आहे, त्यांच्यामध्ये हा आजार अधिक प्रमाणात आढळतो. या संसर्गाचा प्रभाव फुफ्फुसे आणि सायनसवर पडत असल्यामुळे गंभीर स्थिती निर्माण होऊ शकते.*

# सर्वोच्च न्यायालयात २९ जुलै ते ३ ऑगस्ट दरम्यान विशेष लोकअदालत सप्ताह

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती -** नवी दिल्ली येथील सर्वोच्च न्यायालयात दि. २९ जुलै ते ३ ऑगष्ट दरम्यान विशेष लोकअदालत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्यास त्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव एम.डी. कांबळे यांनी केले आहे.

न्यायालयातील तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी मामजस्यातून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकरिता लोक अदालत हे प्रभावी माध्यम म्हणून समोर आले आहे. लोक अदालतीच्या माध्यमातून अनेक पक्षकारानी आपली प्रकरणे तडजोडीद्रारे निकाली काढली आहेत. लोक अदालतीमध्ये तडजोडीदार निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे प्रस्तंवित प्रकरणातील पक्षकार याच्यासोबतच शासन आणि समाज या दोन्ही घटकांना मोठा लाभ प्राप्त झाला आहे. लोक अदालतीमुळे न्यायालयातील



प्रलवित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश आले आहे. लोक अदालतीचे यश लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने प्रलबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्याकरिता विशेष लोक अदालत सप्ताहाने आयोजन २९ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने लोकअदालतीमध्ये ठेवलेल्या प्रकरणांची यादी ह्रींींि:// श्रश्रसश्रीशींळ्ळश्री.ह्रींशीहीर.सें.ळ्प/ डळींश/णश्रिरव/झवष/ च-क-ठ-डक्ढठ-.विष या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी ज्यांची प्रकरणे सदरील यादीमध्ये असतील त्यांनी स्वत: किंवा वकीलामार्फत महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई किंवा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावती येथील ८५९१९०३६२७ या क्रमांकावर संपर्क साधावा.-

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २३ जुलै २०२४

शहर/ग्रामिण


# विभागीय आयुक्तांकडून मोझरी विकास आराखड्यातील कामांचा आढावा

## दासटेकडी येथील इमारतीत भक्तनिवास व कौशल्य प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे नियोजन- विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती–** मोझरी हे ठिकाण वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाज प्रबोधनाने पावन झालेली भूमी आहे.

मोझरी विकास आराखड्यांतर्गत गुरुकुंज मोझरी येथील दासटेकडी परिसरात पूर्ण झालेल्या इमारतीत सर्व सोयीयुक्त भक्तनिवास व युवक-युवतीकरिता रोजगार-स्वयंरोजगारभिमुख कौशल्य प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे प्रभावी नियोजन करण्यात यावे. अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ यांच्या सूचनांना विचारात घेऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या समाजहितोपयोगी विचारांचे दर्शन त्यातून होईल, यादृष्टीने सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी विकास आराखड्यातील कामे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार होण्यासाठी प्रयत्न करावे, असे विभागीय



आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी आज येथे सांगितले.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात आयोजित बैठकीत मोझरी विकास आराखड्यांतर्गत पूर्ण झालेल्या व प्रस्तावित कामांचा आढावा विभागीय आयुक्तांनी घेतला. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या.

जिल्हाधिकारी सौरभ कटियार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त सुरेश वानखेडे, नगरविकास उपायुक्त संतोष कवडे, नियोजन उपायुक्त हर्षद चौधरी, व्यवसाय शिक्षण विभागाचे सह संचालक प्रदीप घुले, रोजगार, स्वयंरोजगार कौशल्य विकास, उद्योजकता उपायुक्त दत्तात्रय ठाकरे आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. पाण्डेय म्हणाल्या की, गुरुकुंज मोझरी येथे मोझरी विकास आराखड्यांतर्गत विविध विकास कामांसाठी शासनाने १२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला आहे. यातून त्याठिकाणी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आध्यात्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक संकुल आणि ग्रामगीतेवर आधारित ग्रामविकास प्रबोधिनी आदी विकासकामे होणार आहेत. सद्यस्थितीत आश्रमच्या परिसरात स्मृती संग्रहालय, यात्री निवास, महासमाधी सौंदर्यीकरण आदी कामे झाली आहेत.

दासटेकडी परिसरात निर्माण करण्यात आलेल्या चार इमारतीमधील एका इमारतीत भक्तांसाठी सर्व सोयीयुक्त ४६ खोल्यांचे भक्तनिवास (स्वच्छतागृह, प्रशासकीय कार्यालय, स्वागत कक्ष आदींचा समावेश) तसेच उर्वरित इमारतींमध्ये युवक-युवतींसाठी अल्प मुदतीचे निवासी प्रशिक्षण केंद्र, इंटरनॅशनल स्कील सेंटर, प्रशिक्षणार्थींच्या निवासासाठी वसतीगृह आदी सुविधा त्याठिकाणी उभारण्याच्या दृष्टीने प्रभावी नियोजन करावे, असे विभागीय आयुक्तांनी यावेळी सांगितले.

मोझरी विकास आराखड्यांतर्गत येत असलेल्या विविध विकासकामांबाबत कार्यान्वयन यंत्रणांसोबत सविस्तर चर्चा आजच्या बैठकीत झाली.

बैठकीत झालेल्या चर्चेनुसार सर्व संबंधित यंत्रणांनी विकास आराखड्यांतर्गत नियोजन अहवाल शासनाला सादर करावा, अशा सूचना विभागीय आयुक्तांनी यावेळी दिल्या.

# राज्यात प्रशासकीय बदल्यांचा मुहूर्त केव्हा?

## अधिकारी-कर्मचाऱ्यांना शासनाच्या नव्या आदेशाची प्रतीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३अमरावती :** लोकसभा निवडणुकी च्या आचारसंहितेमुळे राज्य शासनाच्या ३९ विभागातील हजारो अधिकारी-कर्मचाऱ्यां च्या प्रशासकीय बदल्या रखडल्या आहेत. त्यामुळे या प्रशासकीय बदल्यांचा मुहूर्त केव्हा ? असा सवाल बदली पात्र कर्मचाऱ्यांचा आहे. किंबहुना सप्टेंबर महिन्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याचे संकेत असून यंदा प्रशासकीय बदल्या होणार की नाही, याबाबत चित्र अस्पष्ट आहे.

राज्य शासनाच्या सामान्य प्रशासनाच्या नियमानुसार आणि बदली अधिनियम २००५ मधील तरतुदीप्रमाणे बदली करण्यास सक्षम असलेले प्राधिकरण दरवर्षी मे महिन्याच्या अखेर प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्या करतात; मात्र यंदा झालेल्या लोकसभा निवडणुका आणि मे महिन्यात लागू असणाऱ्या आचारसंहितेमुळे राज्य शासनाने शासकीय कर्मचाऱ्यांची बदली प्रक्रिया केल्यानंतरही बदली धोरण राबविले नाही; मात्र राज्य शासनाकडून बदली संदर्भातील नव्या आदेशाची प्रतीक्षा विभागप्रमुखांना आहे. त्याशिवाय यंदा प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणे अशक्य आहे.

### ३१ हजार प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी वेटिंगवर

सामान्य प्रशासन विभागाने अद्यापही बदली करण्यासंदर्भात आदेश जारी केले नाहीत. त्यामुळे राज्य शासनाच्या ३९ विभागांतील बदलीस पात्र सुमारे ३१ हजार अधिकारी व कर्मचारी वेटिंगवर आहेत. दुर्गम-अतिदुर्गम भागातील कर्मचारी कधी बदली होणार याकडे नजरा लावून आहेत, तर ज्यांना मलाईदार जागा हव्यात अशा महसूल, कृषी, परिवहन, वनविभाग, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी मंत्रालयातील पायऱ्या झिजवत आहेत. काहींनी मोक्याच्या जागांसाठी 'सौदे'देखील केले आहेत. त्यामुळे यंदा बदली न झाल्यास दिलेली 'लक्ष्मी' परत मिळणार नाही, या विवंचनेत अनेकांची झोप उडाल्याचे बोलले जात आहे.

### निवडणुका आटोपल्या तरीही सामान्य प्रशासनाकडून चालढकल

लोकसभा निवडणुकीची मतमोजणी झाल्यानंतर ६ जून रोजी निवडणूक आयोगाने आचारसंहिता संपुष्टात आल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे राज्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या होतील, असे चित्र होते. दरम्यान, मुंबई, कोकण व नाशिक पदवीधर, शिक्षक मतदारसंघात निवडणूक असल्याने बदलीस पात्र हजारो अधिकारी-कर्मचाऱ्यांना ब्रेक लागला. आता निवडणुका आटोपल्या असताना प्रशासकीय बदल्यांकरिता नवे आदेश निर्गमित करण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग चालढकल करीत असल्याचे वास्तव आहे.

# महाआरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी समन्वयाने नियोजन करा- आमदार बच्चू कडू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३ अमरावती–** महिला, पुरुष व बालकांचे आरोग्य सुदृढ रहावे, त्यांच्यावर योग्य उपचार व्हावे यासाठी महाआरोग्य शिबिराचे आयोजन अचलपूर येथे रविवार , दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. शिबिरामध्ये सर्व प्रकारच्या तपासण्या, उपचार व समुपदेशन केले जाणार आहे. महाआरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्रशासन, आरोग्य यंत्रणा व डॉक्टर मेडीकल ग्रुपने समन्वयाने नियोजन करा, अशी सूचना आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी केली आहे.



महाआरोग्य शिबिराची पुर्वतयारी बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवन येथे आज आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौदंळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, उपविभागीय अधिकारी अचलपूर बळवंत अरखराव, उपविभागीय अधिकारी दर्यापूर राजेश्वर हांडे तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी आदी यावेळी उपस्थित होते.

महाआरोग्य शिबिरामध्ये बालरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयरोग कर्करोग, मूत्रपिंड आजार, लघवी संबंधित आजार, रक्त चाचणी अशा विविध रोगाची तपासण्या व समुपदेशन करण्यात येणार आहे. तपासणी दरम्यान संशयित रुग्णांना शस्त्रक्रिया व पुढील उपचाराकरिता मुंबई किंवा आवश्यकतेनुसार आरोग्य सुविधा असलेल्या अन्य ठिकाणी उपचाराकरिता पाठविण्यात येणार आहे. या शिबिरामुळे सामान्य रुग्णालय, तालुका व ग्रामीण रुग्णालयावर येणारा ताण कमी होणार असून एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा उपलब्ध होणार आहे. महाआरोग्य शिबिरामध्ये मोठया संख्येने रुग्ण येणार असल्याने शिबिराच्या ठिकाणी रुग्णांना पाणी, स्वच्छता, वाहतूक सेवा इत्यादी अत्यावश्यक सोयीसुविधा उपलब्ध होईल , यासाठी स्थानिक प्रशासनाने पूर्वतयारी करावी. महाआरोग्य शिबिराच्या यशस्वीतेसाठी सर्व यंत्रणेनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी केले आहे.

## स्वातंत्र्यपूर्व काळातील महाराष्ट्रातील विलक्षण तेजस्वी व्यक्तिमत्व ...




' स्वराज्य हा माझा जन्मसिध्द अधिकार आहे आणि तो मी मिळविणारच ' अशी गर्जना प्रचंड आत्मविश्वासानं करणारी बाळ गंगाधर टिळकांसारखी व्यक्ति एक स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणूनच घडत गेली .लोकमान्य टिळक यांची कारकिर्द म्हणजे भारताला स्वातंत्र्याच्या , स्वराज्याच्या जवळ नेणारे ' लोकमान्य टिळक युग ' होते. आज दिनांक - २३ जुलै लोकमान्य टिळक यांच्या जयंती सोहळा निमित्य से.फ.ला.हायस्कूल धामणगाव- रेल्वे जिल्हा-अमरावतीचे कला शिक्षक -चित्रकार अजय जिरापुरे यांनी आपल्या विद्यालयाच्या दर्शनी फालकावर व तसेच आपल्या विशिष्ट पेनवर्क चित्र शैलीत लोकमान्य टिळक यांचे व्यक्तिचित्र रेखाटन करून त्यांना विनम्र अभिवादन केले आहे...

# कौंडण्यपुरात दहीहंडी सोहळ्याचा उत्साह

## आमदार यशोमती ठाकूर व जगद्गुरू राजेश्वर माउली यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२३तिवसा–** विदर्भाची पंढरी आणि माता रुक्मिणीचे माहेरघर म्हणून जगभरात प्रसिद्ध असलेल्या श्रीक्षेत्र कौंडण्यपूर येथे सोमवारी भरपावसात टाळ-मृदंगाच्या गजरात हजारो वारकऱ्यांनी दहीहंडी सोहळ्याला हजेरी लावली होती. हजारो वारकऱ्यांसह आमदार यशोमती ठाकूर यांच्या उपस्थिती हा सोहळा पार पडला. यावेळी माता रुक्मिणी संस्थानच्या वतीने प्रथमच पंकज महाराज महल्ले यांचे काल्याचे कीर्तन झाले. त्यानंतर जगद्गुरू राजेश्वर माउली यांनी भक्तांनासंबोधित केले.

तिवसा तालुक्यातील श्रीक्षेत्र कौंडण्यपूर हे रुक्मिणीचे माहेरघर असून विदर्भाची पंढरी म्हणून या तीर्थक्षेत्राची ओळख आहे. याच कौंडण्यपुरातून कृष्णाने रुक्मिणीचे हरण केले होते. दरवर्षी पंढरपूरला आषाढी एकादशीनिमित्त लाखो





वारकरी जात असतात. परंतु अनेक वारकऱ्यांना पंढरपूरला जाणे शक्य नसल्याने वारकरी कौंडण्यपूरला एकादशीला येतात. त्यामुळे याठिकाणी यात्रा, दहीहंडी व काला यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आज सकाळपासून कौंडण्यपुरात पालख्यांसह वारकऱ्यांनी दहीहंडी सोहळ्यासाठी हजेरी लावली होती. यावेळी आमदार यशोमती ठाकूर, मंदिर अध्यक्ष नामदेव अंबाळकर, उपाध्यक्ष वसंत डाहे, सचिव सदानंद साधू, अशोक पवार, अतुल ठाकरे, सरपंच प्रेमदास राठोड, संदीप आमले, रितेश पांडव, रवींद्र हांडे, भाजपचे राजेश वानखडे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

या दहीहंडी सोहळ्यासाठी एकूण सात हंड्यांमधून ३५ लिटर दही आणण्यात आले होते. दहीहंडीच्या पूजनानंतर आमदार यशोमती ठाकूरसह मान्यवरांच्या हस्ते दही हे वारकऱ्यांना वितरित करण्यात आले.

# माधान पुलांच्या रस्त्याची झाली दुर्दशा

## पावसाळ्यात पूल उठला नागरिकांच्या व शाळकरी मुलांच्या जीवावर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**सुयोग गोरले**

**दि.२३चांदुर बाजार –** स्वातंत्र मिळून ७५ वर्षे झाली तरी शहरासह ग्रामीण भागाचा विकास झालाच नाही. रस्ते, नाले , वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण या सुविधा नागरिकांना मिळाल्या पाहीजे; परंतु ग्रामीण भागातील नागरिक आजही अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. या ग्रामीण भागागतील माधान ग्रामपंचायत सरपंच व प्रशासन दखल घेण्यास टाळाटाळ करत आहे. सध्या सुरू असलेल्या तीन-चार दिवसांच्या पावसाने तालुक्यासह माधान ग्रामपंचायत परिसरातील नाल्या वर पूल खोलीकरण नसल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली असून या भागातील ग्रामपंचायत जवळ पावसाचे पाणी साचल्याने घाणीचे मुळे रोगराईचे वातावरण तयार झालेल्या आहे पुराचे पाणी गावामध्ये शिरत आहे तर गावामध्ये येत असलेल्या पुरामुळे जाणे येणे करिता व्यवस्थित पूल नसल्याने नागरिक व शाळकरी मुलांच्या जिवावर उठले आहे. ग्रामपंचायत समोरच रोगराई व घाणीचे साम्राज्य असल्याने ग्रामपंचायतचे दुर्लक्ष होत असून गावाचा विकास कसा होणार असाही प्रश्न यावेळी नागरिकांना उपस्थित होत आहे ग्रामपंचायत सरपंच मंदाताई पावडे ह्या महिला असल्याने गावच्या विकासाचे कामाचे कामे त्याचा मुलगा स्वप्नील पावडे कारभार पाहतो त्यामुळे सरपंच कोण असा प्रश्न गावामध्ये उपस्थित होत आहे विकास कामामध्ये कमिशन नावावर सद्या मोठ्या प्रमाणावर हेराफेरी होत असल्याने गावाकडे पूर्ण ता सरपंच व सचिव यांचे दुर्लक्षच होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे सरपंच चा मुलगा व सचिव यांच्या पूर्ण पणे मिलीभगत असल्याने विकासाच्या नावावर निकृष्ट कामे, रस्त्यावर घाणीचे साम्राज्य, नदी नाले तुडुंब भरलेल्या अवस्थेत असल्याचे चित्र माधान मध्ये पाहायला मिळत आहेमाधान हे गाव संत श्री गुलाबराव महाराज ,यांचे देवस्थान आहे या ठिकाणी अनेक भाविक दर्शनासाठी येतात मात्र मुख्य रस्त्यावर अतिक्रमणधारकाने साम्म्राज्य तयार केले असून काही दिवसाआड छोटे मोठे अपघात या ठिकाणी झाले आहे माधान ग्रामपंचायत व प्रशासनाच्या मिलीभगताने अत्यंत बिकट अवस्था गावची झाली आहे तीन दिवसांच्या झालेल्या पावसाने माधान ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामपंचायत सोमर रस्त्यांची



अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. पुलाचे पाणी गावात शिरत आहे , शेण खते रोड वर पडलेल्या अवस्थेत आहे याबाबत सतत स्थानिक नागरिक शासन दरबारी मागणी करत आहे; परंतु ग्रामपंचायत प्रशासन व सरपंच जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असून उडवाउडवीचे उत्तरे देवन नागरिकांच्या समस्येला केराचीटोपली दाखवत असल्याचे बोलल्या जात असल्याचा आरोप भागातील नागरिक करत आहे. गावातील पुलाचे खोलीकरण, पूल बांधणे , नाल्या साफ करणे रस्त्यावर तत्काळ मुरूम टाकणे व लवकरात लवकर या भागातील रस्यांची कामे करण्यात यावी या कडे सरपंच मंदाताई पावडे यांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

# आझाद हिंद मंडळाचा गुरूपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न

## ज्येष्ठ कबड्डी खेळाडू राजन सामदेकर व अण्णा करणे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३अमरावती –** आझाद हिंद मंडळ बुधवारा अमरावती येथे दरवर्षी प्रमाणे यंदाही गुरुपोर्णिमा उत्सव तसेच देशभक्त नानासाहेब बामणगावकर यांचे स्मृती प्रित्यर्थ गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी खेळाडूव समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवराचा यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून खासदार बळवंत वानखडे, आमदार धीरज लिंगाडे, अमरावती महानगर पालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, माजी खासदारअनंत गुढे, सामाजिक कार्यकर्ते दिनेश बुब, शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष प्रदीप



राऊत, भैय्या पवार, युवाउद्योजक सचिन हिवसे, नितीन कदम, कैलाश गिरोडकर, बंडू हिवसे, सभापती हरिष मोरे यांचे सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे सयोंजक तथा मंडळाचे कार्याध्यक्ष विलास इंगोले, माजी महापौर यांनी केले.

सर्व पाहुण्यांचे स्वागत व सत्कार मंडळाचे कार्याध्यक्ष विलास इंगोले, उपाध्यक्ष अनंत गुढे, डॉ किशोर फुले, कोषाध्यक्ष दिलीप दाभाडे, सचिव दिलीप कलोती, आंतरराष्ट्रीय खेळाडू सुरेंद्र चिखलकर, सतीश चौधरी, नितीन सराफ, राजेश जयादे, प्रवीण चौधरी, प्रमोद इंगोले भुषण पुसतकर यांनी केले

या प्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापठाच्या कुलसचिव पदी निवड झाल्याबद्दल डॉ अविनाश असनारे , गेल च्या संचालक पदी निवड झाल्याबददल डॉ रविकांत कोल्हे तरअनाथ वृदधाच्या सेवा करणाऱ्या जगदंब संस्थेचा कार्यकर्त्यांचा तसेच हिरकणी पुरस्कर प्राप्त सुरेखा धर्माले, प्रौढ खेळाडू नंदाताई सोनुने, टेनिस क्रिकेट असो. चे सचिव पदी निवड झाल्याबद्दल नितीन सराफ, महीला वेटलिफ्टर स्वाती गाडे तसेच पोलीस ट्रेनिंग कोच श्री धुरंदर सर, कुस्ती कोच प्रा. मनोज तायडे, जितेंद्र राजपूत, राज्यसेवा पुरस्कार प्राप्त पोलीस कर्मचारी लक्ष्मण बुंदीले , तसेच ज्येष्ठ कबड्डी खेळाडू राजन सामदेकर व अण्णा करणे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला मंडळाचे ज्येष्ठ तसेच समाजातील ज्येष्ठ बंडुभाऊ मोरे, अशोकजी अग्रवाल, द्वारकाप्रसाद अग्रवाल, कैलाशजी जोशी, बाबुलाल मामर्डे नुरा बिजली पहिलवान, रफिक भाई, गझलकार अनंत नांदुरकर ( खालिश) यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अमरावती म. न. पा. कर्मचारी पत संस्थे वर निवडून आलेल्या



संचालकांचा देखिल सत्कार करण्यात आला.सदस्य सर्व श्री राजाभाऊ माजलगावकर, प्रकाशभाऊ संगेकर, ज्ञानेश्र्वर हिवसे, नंदू गुंबळे, राजेंद्र महल्ले, डॉ अजय गु ल्हाने, राजु भेले, सुरेश रतावा सुभाष पावडे, गजानन राजगुरे शैलेश अग्रवाल अशोक बामणगावकर, विजु भुतडा,मदन पुसतकर नितिन इंगोले, विलास इंगोले, सुरेश वैश्य किशोर कलोती, जयंत देशपांडे, प्रा. गणेश मालोकर, संजय संगेकर, सुशील कथलकर नंदू हतोले , प्रवीण पाटील, सतीश इंगोले, संजय वाकोडे, उमेश देशमुख, संजय कदम, जितेश नाईक अजय पुसतकर, निलेश सराफ, संतोष चीखलकर, संदीप खेडकर, संजय तल्हार,शुभम काशीकर, डॉ आकाश मोरे, आशिष बामणगावकर, गजानन गुडधे, डॉ सुभाष गावंडे, मनीष चौधरी, पंकज सराफ, मयूर जलतारे, अजय इंगोले, मुन्ना दुलारे, सचिन कोहळे, गणेश बोराटणे, संदीप इंगोले, डॉ नितिन चव्हाळे, सागर इंगोले, मनोहर चौधरी, राजू इंगोले अब्दुल गनी, गणेश वदुरकर, प्रवीण फुलारी, योगेश पुंड, संजय शेरेकर, अनिकेत ढेंगले नंदू हातोले, अभिनंदन पेंढारी, रघुभाऊ निमगावकर, शुभम शेगोकार, यांचे सह अनेक मान्यवर उपस्थतीत होते.सर्वच प्रमुख पाहुण्यांनी मार्गदर्शन करतांना सत्कार मुर्ती चे अभिनंदन करुन कार्यक्रमाचे कौतुक केले.कार्यक्रमाचे संचलन व आभार प्रदर्शन संजय मुचळंबे यांनी केले

# राज्यात नवी राजकीय आघाडी! रविकांत तुपकर यांची मोर्चेबांधणी; पुण्यात पदाधिकाऱ्यांची बैठक

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३बुलढाणा –** राज्यात नवीन राजकीय आघाडी तयार करण्यासाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. याच दृष्टीने तुपकर यांची येत्या २४ जुलै रोजी पुणे येथे महत्त्वाची राज्यस्तरीय बैठक होत आहे. या बैठकीत विधानसभा निवडणुकांवर चर्चा होणार असून महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर होण्याची दाट शक्यता आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने समविचारी राजकीय पक्ष, संघटना यांची मोट बांधून तिसरी आघाडी तयार करण्याचे प्रयत्न तुपकर यांनी चालविले आहे. मध्यंतरी त्यांनी प्रहार संघटनेचे नेते तथा आमदार बच्चू कडू यांच्यासह काही नेत्यांशी संवाद साधला होता. त्या पार्श्वभूमीवर एस.एम. जोशी फाऊंडेशन सभागृह, नवी पेठ, पुणे येथे सकाळी १० वाजता बैठक



लावण्यात आली आहे. या बैठकीत विचारमंथन व चर्चा करून शेतकरी चळवळीची पुढील आंदोलनात्मक तसेच राजकीय दिशा ठरविली जाणार आहे. बैठकीत राज्यभरातील चळवळीतील प्रमुख नेते सहभागी होणार आहेत.आगामी विधानसभा निवडणूक पाहता ही बैठक महत्त्वाची मानली जात आहे. या बैठकीत चळवळीची पुढील दिशा व राजकीय भूमिका यावर विचारमंथन होणार आहे. तसेच या बैठकीत नवी राजकीय घोषणा होण्याचीदेखील शक्यता नाकारता येत नाही. शेतकरी चळवळीचा युवा चेहरा आणि आक्रमक नेतृत्व ही तुपकर यांची ओळख आहे. चळवळीतील नव्या-जुन्या सर्व प्रमुख पदाधिकारी व युवा कार्यकर्त्यांना एकत्र करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.

### विधानसभा लढण्याचा निर्णय

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत रविकांत तुपकर यांनी बुलढाणा लोकसभा मतदारसंघात अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. तब्बल अडीच लाख मते घेत त्यांनी प्रमुख पक्षांसह राजकीय विश्लेषकांचे लक्ष वेधून घेतले. तुपकर यांनी जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. बैठकीत बुलढाणा जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांत उमेदवार उभे करण्याची घोषणा त्यांनी केली होती. प्रमुख पदाधिकाऱ्यांनी तुपकरांना विधानसभा निवडणूक लढण्याचा आग्रह केला. त्यामुळे संपूर्ण ताकदीनिशी बुलढाणा जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांत निवडणूक लढवायची, असा निर्धार करून जोश भरला होता. मात्र, स्वतः कोणत्या मतदारसंघातून लढणार हे गुलदस्त्यात ठेवले होते.

# पतपुरवठ्याचे उद्दिष्ट पूर्ण करा -जिल्हाधिकारी कुंभार

## नियोजनभवनात खरीप पतपुरवठ्याचा आढावा

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३ अकोला –** अकोला जिल्ह्यातील एकही पात्र शेतकरी कर्ज मिळण्यापासून वंचित राहू नये यासाठी पतपुरवठ्याला गती देतानाच, शासनाच्या विविध योजनांतर्गत प्राप्त कर्ज प्रकरणांचाही वेळीच निपटारा करावा व पात्र व्यक्तींना योजनांचा लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.खरीप हंगाम पीक, तसेच योजना अंतर्गत कर्ज वितरणाचा आढावा घेण्यासाठी नियोजनभवनात आयोजित बैठकीत ते बोलत होते. अग्रणी जिल्हा व्यवस्थापक् नयन सिन्हा आणि विविध बँकांचे क्षेत्रीय प्रमुख व वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यात जास्तीत जास्त शेतकरी बांधवांना पतपुरवठा व्हावा यासाठी कर्ज



वितरणाचे उद्दिष्ट पूर्ण करावे. गावोगावी जाऊन गरजू शेतकरी बांधवांपर्यंत पोहोचून कर्जवाटप करावे. कर्ज वितरणाचे काम मोहिम स्तरावर पूर्ण होणे आवश्यक आहे, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

चालू खरीप हंगामात १ हजार ३०० कोटी रू. कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असून, ७१ टक्के कर्ज वाटप झाले आहे. राष्ट्रीयकृत व्यापारी तसेच खाजगी बँकांनी पाठपुरवठ्याचे उद्दिष्ट पूर्ण करून अधिकाधिक शेतकरी बांधवांना खरीप कर्जाचा लाभ मिळवून द्यावा. स्टेट बँक ऑफ इंडिया, युनियन बँक, आयडीबीआय, रुळी बँक , इंडियन बँक यांचे कर्ज वितरण कमी आहे. या स्थितीत त्यांनी तत्काळ सुधारणा करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

केंद्र व राज्य शासनाच्या योजना अंतर्गत कर्ज प्रकरणांचा ही आढावा यावेळी घेण्यात आला. केंद्र व राज्य सरकारकडून विविध घटकांसाठी बँकांच्या माध्यमातून अनेक उत्तम योजना राबविल्या जातात. अशा योजना अंतर्गत प्राप्त होणारे अर्ज विहित वेळेत निकाली काढावेत. कृषी, उद्योग व्यवसायासाठी प्राप्त अर्जांची पूर्तता करून घेऊन संबंधितांना लाभ मिळवून द्यावा जेणेकरून या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होईल व विकासाला गती मिळेल, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री कुंभार यांनी दिले.

# अन...अंगावर कोसळली घराची भिंत

## आई,वडिलांसह मुले दबल्याने जखमी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३धा. रेल्वे–** तालुक्या सह शहरात पावसाची रिपरिप गेल्या दोन दिवसांपासून सुरू आहे. दरम्यान शहरातील टिळक चौका जवळील एका राहत्या घराची भित कोसळल्यामुळे यात दबून कुटुंबातील चार जण गंभीर जखमी झाले. ही घटना सोमवारला (ता.२२) सकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली. परंतु परिसरातील नागरिकांच्या सतर्कतेने मोठा अनर्थ टळला.मिळालेल्या माहितीनुसार असे की, येथील टिळक चौकाजवळील स्वर्गीय पुखराजजी कुचेरिया मार्गावर दिलीप सुलताने यांचे घर आहे. दरम्यान सोमवारला (ता.२२) सकाळी ७ वाजताच्या सुमारास त्यांची दोन मुले ही शाळेत जाण्याची तयारी करत होते तर महिला आणि दिलीपसुलताने हे घरात असतांना अचानक घराची भित अंगावर पडली. त्या मोठ्या आवाजाने समोर असणारे अशोक कुचेरिया, बालूयादव, करण उपाध्याय व इतर नागरिकांनी बाहेर येऊन बघितले असता, त्यांच्या लक्षात आले की दिलीप सुलताने यांच्या घराची भित कोसळली तेव्हा लगेच सर्व नागरिक हे घरामध्ये जाऊन बघितले असता,



भितीखाली चौघही दबलेले होते. या चारही जणांना नागरिकांनी बाहेर काढले व तत्काळ ग्रामीण रुग्णालयात भरती केले. त्यामध्ये सोनाली सुलताने (३०), पार्थ सुलताने (१२), अंशू सुलताने (७) यांना गंभीर दुखापत झाली असून दिलीप सुलताने यांना किरकोळ मार लागलेला आहे. दोन मुले व पत्नी यांना पुढील उपचारा करिता यवतमाळ येथे पाठविण्यात आले आहे.घटनाही रात्रीच्या वेळेस घडली असती तर मोठा अनर्थ झाला असता, असा कयास व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान जि प माजी सदस्य मोहन सिघवी, अशोक कुचेरिया, बालू यादव, करण उपाध्याय , दत्ता वाघ, किशोर माडले, चापलेकर, निखिल क्षीरसागर, रवींद्र लोंदे , राहुल उईकेयांच्या सतर्कते मुळे भिती मध्ये दबलेल्यांना वाचविण्यात यश आले.

# आणखी दोन आरोपींना अटक

## सीपी स्पेशल स्कॉडची कारवाई आतापर्यंत ७ जणांना अटक

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३अमरावती–** राजापेठ ठाण्याच्या हद्दीतील केडीया नगर चौकात १८ जुलैला घडलेल्या रोहित मांडले हत्याकांडातील आणखी दोन आरोपींना सीपी रेड्डी यांच्या स्पेशल स्कॉडने अटक केली आहे. या गुन्ह्यात आतापर्यंत एका अल्पवयीनसह आरोपींची संख्या ७ झाली आहे. उर्वरित फरार आरोपींना पोलिस कसून शोध घेत आहेत.

**रोहित मांडले हत्याकांड**

समीर डोंगरे, रा. बेलपुरा, दादु जांभुळकर, रा. सुशिल नगर अशी अटकेतील दोन्ही आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी घटनेच्या मध्यरात्री अल्पवयीनसह यश काटे, नितिन इंगोले, सोनू झांडोडे व भुषण वाटकर यांना अटक केली होती. सर्व आरोपींनी १८ जुलैला रात्री केडीया नगरात चौकात लहान भावाबर्थडे सेलिब्रेशन करणाऱ्या रोहित अमोल मांडळे(२५, रा. गोंडपुरा, राजापेठ) याची हत्या केली म होती. लॉक डाऊनच्या काळात राजापेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या एमआयडीसी परिसरात बच्चू वानखडे याची वाढ – दिवसाच्या दिवशी हत्या केली होती. मृतक रोहित मांडळे हा त्या गुन्ह्यात सहआरोपी होता. तेव्हापासूनच अटकेतील आरोपी रोहितच्या – रोहित हत्येचा प्लान बनवित होते. १८ जुलैला लहान भावाचा वाढदिवस असल्याने रोहित केडीया नगर चौकात मनपा बगीच्या जवळ त्याचा वाढदिवस साजरा करित होता. बर्थडे सेलिब्रेशननंतर आरोपींनी रोहितला कारने धडकदिली वहल्लाकरून त्याचीहत्या केली. सीपी स्पेशल स्कॉडला फरार आरोपी समीर डोंगरे व दादु जांभुळकर याचे लोकेशन मिळाल्यानंतर स्कॉडने दोघांना अटक करून राजापेठ पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

# गुन्हे शाखेतील १० पोलिस मुख्यालयामध्ये केले अ‍ॅटॅच

## पोलिस आयुक्तांकडून अंमलदारांच्या कामाचा आढावा

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३अमरावती** शहरात घडलेले गुन्हे उघड करण्यासह गुन्हेगारांवर वचक बसावा म्हणून पोलिस आयुक्तांनी मागील वर्षी गुन्हे शाखेचे दोन युनिट तयार केले. मात्र गुन्हे शाखेकडून पोलिस आयुक्तांना अपेक्षित कामगिरी झाली नाही. त्यामुळेच पोलिस आयुक्तांनी सोमवारी दोन्ही युनिटमधील प्रत्येक अंमलदारांच्या कामकाजाचा आढावा घेतला. या वेळी मागील काही महिन्यात कामात अपेक्षित परफॉर्मेन्स नसलेल्या दोन्ही युनिटमधील १० अंमलदारांना गुन्हे शाखेतून घेट पोलिस मुख्यालयात उजळ्मो कोर्सच्या नावे अ‍ॅटॅच केले आहे.

मागील काही महिन्यांपासून गुन्हे शाखेची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही. गुन्हे शाखेतील काही अंमलदार व्यवस्थित काम करत नसल्याच्या निष्कर्षाप्रत पोलिस – आयुक्त पोहोचले आहेत.

### गुन्हे शाखेतून मुख्यालयात पाठवलेले अंमलदार

ग्रेड पीएसआय संजय वानखडे, गजानन ढेवले, दीपक सुंदरकर, मो. एजाज, विकास रायबोले, जावेद अहमद, मनोज ठोसर, चंद्रकांत रामटेके, निवृत्ती काकड आणि महादेव कास्देकर यांचा समावेश आहे.

त्यामुळे त्यांनी सोमवारी दुपारी देही बुनिटमधील प्रत्येक अंमलदारासोबत चर्चा करून त्यांनी केलेल्या वैयक्तिक कामगिरीचा – आढावा घेतला, या वेळी काहींना तर मागील सहा महिन्यात स्वतःकाय केले, हे सुद्धा सांगता आले नाही. अनेक कर्मचारी वर्षानुवर्षांपासून ऐनकेन मागनि प्रयत्न करून गुन्हे शाखेत पोहोचले आहेत. परंतु कामात अपेक्षित प्रगती नाही. त्यामुळे पोलिस आयुक्तांनी दहा अंमलदारांना उजळणी कोर्ससाठी गुन्हे शाखेतून थेट मुख्यालयात पाठवले आहे. .

### कामात हयगय केल्यास यापुढेही कारवाई



होणार गुन्हे शाखेत कार्यरत सर्व पोलिस अधिकारी व अंमलदाराकडून त्यांच्या कामगिरीचा आढावा घेतला. या वेळी सुमारे १० जणांचा 'परफॉर्मन्स' समाधानकारक नसल्याचे लक्षात आले, त्यामुळे त्यांना पोलिस मुख्यालयात अटैच करण्यात येत आहे. कामात हयगय करणा-यांवर यापुढेही याचप्रकारे कारवाई होणार आहे.

नवीनचंद्र रेड्डी, पोलिस आयुक्त

# पावसाने १३०० हेक्टरवरील पिके बाधित

## तूर,कपाशी,सोयाबीन चे सर्वाधिक नुकसान

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२३अमरावती –** तीन दिवसांपासून जिल्ह्यात होत असलेल्या सार्वत्रिक पावसाने साधारण १२३३ हेक्टरमध्ये नुकसान झाल्याचा कृषी विभागाचा प्राथमिक अहवाल आहे. यामध्ये अमरावती, चांदूर रेल्वे, धामणगाव, अचलपूर, चिखलदरा, दर्यापूर व चांदूर बाजार तालुक्यात तूर, कपाशी व सोयाबीनचे नुकसान झालेले आहे.

शिवाय नदी-नाल्यांना आलेल्या पुरामुळे काठालगतची ४३० हेक्टर शेती खरडून गेली आहे.यामध्ये सर्वाधिक ५९५ हेक्टरमध्ये सोयाबीन पिकाचे नुकसान झालेले आहे. अमरावती तालुक्यात ८९ हेक्टर, धामणगाव ५० हेक्टर, चिखलदरा २० हेक्टर व चांदूर बाजार तालुक्यात ४६ हेक्टरचा



समावेश आहे. शिवाय १४७ हेक्टरमधील कपाशी, ५८ हेक्टरमध्ये तूर, ४ हेक्टरमध्ये ज्वारी, १ हेक्टर मका पिकाचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल आहे.

अमरावती तालुक्यात १५८ हेक्टर, चांदूर रेल्वे ३५, धामणगाव ९५, अचलपूर ४३०, चिखलदरा ४८, दर्यापूर ३५५ व चांदूर बाजार तालुक्यात ११० हेक्टरमधील पिकांचे नुकसान झालेले आहे. या आपत्तीमध्ये अचलपूर तालुक्यातील ४३० हेक्टर शेती खरडून गेली आहे. या बाधित क्षेत्राचे पंचनामे अजून पर्यंत सुरू झाले नसल्याची माहिती आहे.

### दोन व्यक्तींचा मृत्यू: १४ जनावरे मृत

११ ते २२ जुलैदरम्यान लालखडी येथील परवेज खान (१२) व ब्राह्मणवाडा भगत येथील अशोक राहाटे (३०) हे दोन व्यक्तीपुरात वाहून गेल्याने मृत झाले, तर १३ लहान व १ मोठे अशा १४ गुरांचा मृत्यू झाला आहे. सततचा पावसाने ११ तालुक्यांतील ६२ घरांची पडझड झाल्याचा महसूल यंत्रणेचा प्राथमिक अहवाल आहे.

### पाच मंडळांमध्ये मुसळधार

आठ दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू आहे. या दरम्यान २४ तासात जिल्ह्यात सरासरी २०.९ मिमी पावसाची नोंद झाली. मेळघाटासह मोर्शी तालुक्यात मुसळधार पाऊस झाला. आतापर्यंत सर्वात कमी पाऊस झालेल्या धुळघाट मंडळात पहिल्यांदा दमदार पावसाची नोंद झाली. या मंडळात ६५ मिमी सादाबर्डी ६५ मिमी, चिखलदरा ७६.३ मिमी, शिरखेड ७१.८ मिमी व रिद्धपूर मंडळात ६६ मिमी पाऊस झाल्याने अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. जिल्ह्यात १२ जून रोजी मान्सून दाखल झाला होता. तेव्हापासून आतापर्यंत २८ महसूल मंडळात अतिवृष्टी झालेली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ३४२.६ मिमी पावसाची सरासरी अपेक्षित असताना प्रत्यक्षात ३२२.२ मिमी पाऊस झालेला आहे. ही ९४ टक्केवारी आहे. या आठवड्यात पावसाची आकडेवारी वाढली असली तरी अद्याप धारणी, चिखलदरा, अमीणती, भातकुली, मोर्शी व अचलपूर तालुक्यात पावसाने सरासरी गाठलेली नाही.

# रेशनच्या दुकानात ऑगस्ट महिन्यात गव्हाऐवजी ज्वारी मिळणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

रेशनच्या दुकानात ऑगस्ट महिन्यात गव्हाऐवजी ज्वारी मिळणार असल्यामुळे भाकरी खाण्याची आवड असलेल्यांची मजा होणार आहे. त्याचवेळी गहू मिळणार नसल्याने ज्यांना पोळी खायची आहे, त्यांना खिशातून पैसे खर्च करून गहू खरेदी करावा लागणार आहे. जिल्ह्यातील ज्वारी उत्पादक शेतकऱ्यांकडून रब्बी हंगामात शासनाने ज्वारी खरेदी केली होती. ती ज्वारी उपयोगात यावी, या उद्देशाने अंत्योदय व प्राधान्य गटातील लाभार्थी रेशनकार्ड धारकांना वाटप केली जाणार आहे.महिन्यातच नव्हे तर जिल्ह्यातून खरेदी करण्यात आलेली ४२ हजार क्विंटल ज्वारी संपत नाही तोपर्यंत हे वाटप केले जाईल, अशी माहिती जिल्हा पुरवठा विभागाद्वारे देण्यात आली. अंत्योदय गटात १ लाख २७ हजार ७६४, तर प्राधान्य गटात ५ लाख ६९ हजार ८८४ लाभधारक आहेत. त्यामुळे एकाच महिन्यात ज्वारी संपण्याची शक्यता जास्त आहे. सर्वच लाभार्थी ज्वारी घेतील काय, असाही प्रश्न आहे. कारण, सध्या बहुतेकांना गव्हाची पोळी खाण्याची सवय आहे. यात चवीत बदल म्हणून अनेकजण आठवड्यातून एकदा किंवा दोनदा अथवा आवडीनुसार भाकरी खातात. काही नाईलाजाने तर काही नवी बाब म्हणून ज्वारी घेतीलही. कारण, सध्या बाजारात गहू ३० ते ३७ रुपये किलो तर ज्वारी दर्जानुसार ४० ते ४५ रुपये प्रतिकिलो दराने मिळत आहे. मागील काही वर्षांत ज्वारीचे उत्पादन घटल्यामुळे ज्वारीचे दर हे गव्हाच्या तुलनेत जास्त आहेत. तसेच आजवर रेशन दुकानात गहूच मिळत आला आहे. त्यामुळे ऑगस्ट या ऐन सणासुदीच्या महिन्यात ज्वारी मिळणार असल्यामुळे लाभार्थींना ती कितपत आवडणार हा देखील एक प्रश्न आहे.



### शासनाच्या आदेशानुसार.....

शासनाने रब्बी हंगामात ४२ हजार क्विंटल खरेदी केलेली ज्वारी ऑगस्टच्या स्वस्त धान्यात अंत्योदय व - प्राधान्य गटातील लाभार्थींना वाटप करण्यात येणार आहे. ही ज्वारी संपत नाही तोपर्यंत तिचे वाटप शासनाच्या आदेशानुसार केले जाणार आहे.

**– निनाद लांडे, जिल्हा पुरवठा अधिकारी.**

# जिल्ह्यात ५४ रस्ते, १५ पूल धोकादायक शासनाकडे दुरुस्तीकरिता ७०० कोटींचा प्रस्ताव

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

जिल्ह्यात पुरामुळे ८५ किमीचे ५४ रस्ते, १५ पूल व काही रपटे खराय झाले आहेत. त्यामुळे हे रस्ते आणि पूल पावसाळ्यात धोकादायक ठरत असून याकरिता जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने शासनाकडे ७०० कोटी रुपयांचा दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केला आहे. परंतु, अद्याप निधी अप्राप्त आहे. त्यामुळे निधीअभावी या खराब रस्त्यांचे बांधकाम रखडले आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारित येणारे रस्ते आणि पुलांच्या मेंटनन्सची जबाबदारीदेखील पाच विभागाकडे आहे. अशा एकूण ७ हजार किमीचे रस्ते जिल्हा ग्रामीण रस्ते अंतर्गत आहे. मागील वर्षी आलेल्या पुरामुळे जिल्ह्यातील ८५ किमीचे ५४ रस्ते, १५ पूल यासोबत रपटे, मोठी नाली खराच झाले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाकडून अशा ८८ कामांची वार्टी तयारी करून शासनाकडे २,७५४ कोटींच्या निधीची मागणी दुरुस्तीकरिता करण्यात आली होती. परंतु शासनाकडून सदरचा प्रस्ताव पुन्हा तयार करीत अतिमहत्याच्या रस्ते आणि पुलांकरिता ७०० कोटींची मागणी शासनाकडे करण्यात आली. या पावसाळ्यात देखील ५४ रस्ते, १५ फूल, रपटे आणि मोठी नाती है दुरुस्ती अभावी धोकादायक ठरत आहे, त्यामुळे या वर्षात या रस्त्यांना दुरुस्तीकरिता निधी मिळतो का, याकडे लक्ष लागले आहे.



जिल्ह्यातील खराब झालेले रस्ते आणि पूल, रपटे, नाली अशा ७५ कामांची यादी शासनाकडे पाठविली आहे. याच्या दुरूस्तीकरिता ७०० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आहे. निधी मंजूर झाल्यास पावसाळ्यानंतर कामांना सुरुवात होईल.

**दिनेश गायकवाड, कार्यकारी अभियंता**

# सहा वर्षांपूर्वी बांधलेले शौचालय वृद्धाच्या अंगावर कोसळले : अंजनसिंगी येथील प्रकार

**विर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अंजनसिंगी**

स्वच्छ भारत अभियानअंतर्गत बांधण्यात आलेले शौचालय एका ८३ वर्षीय वृध्दाच्या अंगावर कोसळले. ही घटना सोमवारी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास अंजनसिंगी येथे घडली. या घटनेमध्ये किसन बाणासुरे नामक वृध्द जखमी झाले आहे. या घटनेमध्ये शौचालय बांधकामावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्या जात असुन चौकशीची मागणी करण्यात आली आहे.अंजनसिंगी येथे स्वच्छ भारत विभागाने राबविलेल्या हागणदारीमुक्त योजनेअंतर्गत २०१७-१८ या कालावधीत गावोगावी शौचालयाचे बांधकाम कंत्राटदारांमार्फत करण्यात आले. अशातच अंजनसिगी येथे देखील बहुतांश घरी शौचालयाचे बांधकाम सुरू असतानाच सदचे काम निकृष्ट असल्याची ओरडनागरीकांनी केली होती. मात्र त्यावेळी याची दखल घेतली नाही. अखेर सोमवारी सहा वर्षापुर्वी बांधलेले शौचालय अचानक कोसळुन जमिनदोस्त झाले आहे. त्यामुळे आता या बांधकामावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. मात्र या निकृष्ट बांधकामाचा फटका किसन बाणासुरे या वयोवृध्दाला बसला आहे. सायंकाळी अचानक त्यांच्या अंगावर हे शौचालय कोसळल्याने ते पुर्णता यामध्ये दबले होते. त्यामुळे नागरीकांनी धाव घेवुन त्यांना बाहेर काढले. यामध्ये त्यांना चांगलीच दुखापत झाली असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहे. घटनेमुळे नागरीकांनी संताप व्यक्त केला असुन संबधित कंत्राटदारावर कारवाईची मागणी केली जात आहे.



# अकरावीच्या तिसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी जाहीर

## एक हजार ५१४ विद्यार्थी प्रवेशाकरीता पात्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

अकरावी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. यंदा सुमारे १६ हजार १६० जागा उपलब्ध आहेत. यावर्षी ९ हजार ९३५ जणांनी नोंदणी केली. सोमवारी तिसरी गुणवत्तायादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये १ हजार ५१४ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना २४ जुलैपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यावयाचे आहे. अशी माहिती प्रवेश प्रक्रिया समन्वयक प्रा. अरविंद मंगळे यांनी दिली. तथापिअजूनही ९ हजारांच्या आसपास जागा शिल्लक आहेत. त्यामुळे अकरावी प्रवेशाची चौथी फेरीही राबविण्यात येणार आहे.



अमरावती महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी राबवण्यात येणाऱ्या अकराची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेस सुरुवात झाली आहे. शहरात ९ हजार ९३५ विद्यार्थ्यांनी अर्जाचा भाग २ भरला आहे. त्यानुसार तिसरी गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. शहरातील ६८ कनिष्ठ महाविद्यालयांत ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. तत्पूर्वी प्रवेशासाठी २४ मेपासून नोंदणी सुरू झाली. ५ जूनपासून विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पसंती दर्शवणारा अर्ज क्रमांक दोन भरण्यास सुरुवात झाली. त्यानंतर १८ जूनला इनहाऊस, अल्पसंख्याक कोटा वादी प्रसिध्द करण्यात आली असून १८ ते २१ जून दरम्यान शून्य प्रवेश फेरी झाली आहे. यामध्ये ७९३ प्रवेश कोट्या अंतर्गत झाले आहेत. वामध्ये कला शाखेत ११५ प्रवेश, वाणिज्य शाखेत १४५ तसेच विज्ञान शाखेत सर्वात जास्त महणजेव ५३० प्रवेश झाले असून एचएससीबीसीमध्ये ३ प्रवेश निश्चित झाले आहे. तसेच प्रवेशाच्या दोन फेऱ्या आटोपल्या आहेत. तिसरी गुणवत्ता यादी सोमवारी प्रसिद्ध करण्यात आली. यादीनुसार कला शाखेत २१७, वाणिज्य शाखेत २२९ तर विज्ञान शाखेत सर्वाधिक १ हजार ३२ विद्याध्यांचे प्रवेश निश्चीत झाले आहेत. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रम (एमसीव्हीसी) ३६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहे. या सर्व विद्यार्थ्यांना २४ जुलैपर्यंत संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यायचे आहे.

# बीज प्रक्रिया संचासाठी १० लाखांपर्यंत अनुदान जुलै अखेरपर्यंत अर्जाची मुदत : शेतकरी कंपनी ठरणार पात्र



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाच्या वतीने अन्न आणि पोषण सुरक्षा कडधान्य योजनेअंतर्गत बीजप्रक्रिया संचासाठी योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी, संघ हे आपले अर्ज ३१ जुलै २०२४ पर्यंत तालुका कृषी कार्यालयात सादर करू शकतात, बीजप्रक्रिया प्रकल्प उभारणीस प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किंवा १० लाख यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान दिले जाणार आहे.

या योजनेसाठी नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी किंवा संघ पात्र असेल. लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी, संघयांनी तालुका कृषी कार्यालयाने अर्जाला मंजुरी दिल्यानंतर राष्ट्रीयीकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करावा, बँकेने कर्ज मंजूर केल्यानंतर संबंधित शेतकरी, उत्पादक कंपनी, संघ अनुदानाच्या लाभास पात्र राहणार आहे. लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी, संघ यांनी अर्ज करताना ज्या कार्यक्षेत्रात कंपनी आहे, त्या कार्यालयात अर्ज सादर करावा लागणार आहे. अर्जासोबत शेतकरी त्पादन कंपनी, नोंदणी प्रमाणपत्र, कमिठी ठराव आवश्यक आहे.

### अर्ज करण्याची ३१ तारखेची मुदत

शेतकरी उत्पादक कंपनी, संघ हे ३१ जुलै २०२४ अखेर कार्यक्षेत्रातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज करू शकतात. निवड झालेल्या उत्पादक कंमनीस आवश्यक कागदपत्रांच्या छाननीनंतर पूर्वसंमती देण्यात येईल.

### शेतकरी उत्पादक कंपन्यांनी करावा अर्ज

नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी, संघ यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात दिलेल्या मुदतीत अर्ज करावेत, ज्या आर्थिक वर्षात पूर्वसंमती देण्यात आली आहे, त्यांचे आर्थिक वर्षात बीज संच प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

# प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग संस्थेकडून आनंदवनात रुग्णसेवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

स्थानिक प्रसुतीशास्त्र व स्त्रीरोग संस्थेच्यावतीने वरोरा येथील महारोगी सेवा समिती आनंदवन येथे 'एक्सचेज कॉन्फरन्स' या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. २० व २१ जुलै २०२४ या कालावधीत पार पडलेल्या परिषदेत आनंदवनातील अंध, अपंग तसेच विविध दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णांशी संस्थेच्या तज्ञ डॉक्टरांनी संवाद साधून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले.विविध सेवा कार्यात अग्रेसर असलेल्या अमरावती येथील प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग संस्थेच्यावतीने २० व २१ जुलै २०२४ रोजी आनंदवनातील अंध, अपंग तसेच विविध दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णांना मार्गदर्शन करण्यासाठी 'एक्सचेज कॉन्फरन्स'या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




संस्थेच्या पुणे व चंद्रपूर शाखेच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमाला समाजसेवक डॉ.विकास आमटे व डॉ.पल्लवीताई आमटे, प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग संस्था पुणेच्या अध्यक्ष डॉ. आरती लिमकर, सचिव डॉ. मीनाक्षी देशपांडे, डॉ. अमोल लुंकड, प्रसूतीशास्त्र व स्त्रीरोग संस्था चंद्रपूरचे अध्यक्ष डॉ. मीनाक्षी घाटे, सचिव डॉ.मनीषा वसादे, डॉ. कीर्ती साने, प्रसूतीशास्त्र व स्त्री रोग संस्था अमरावतीचे अध्यक्ष डॉ. रश्मी खार, सचिव डॉ. मनाली ढोले यांची उपस्थिती होती. यावेळी संस्थेच्या तज्ञ डॉक्टरांनी आनंदवनातील अंध, अपंग व्यक्तीच्या तसेच महिलांच्या गर्भाशय कॅन्सर यासारख्या आजारावरील तपासण्या करून त्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर आनंदवनात वास्तव्यास असलेल्या अंध, अपंग कलाकारांनी उपस्थितांसमोर आर्केस्ट्रा सादर करून त्यांना मंत्रमुग्ध केले. यावेळी समाजसेवक डॉ.विकास आमटे व डॉ.पल्लवीताई आमटे यांनी आपल्या मनोगतातून आनंदवनात अव्याहतपणे सुरू असलेल्या रुग्णसेवेची माहिती दिली. यावेळी तज्ञ डॉक्टरांमध्ये डॉ. मोनाली ढोले,डॉ.पुष्पा जुनघरे, डॉ. मिनल देशमुख, डॉ. निधी सोनोने, डॉ.शलका बारी, डॉ. नीलिमा अरडक, डॉ.आरती मूरके, डॉ. उज्वला गुल्हाने, डॉ. वनिता गावंडे, डॉ.रश्मी कहार, डॉ.रेवती ढवळे, डॉ. वासंती कडू आदींचा सहभाग होता.

# आता जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये महावाचन उत्सव उपक्रमासाठी ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची सदिच्छादूत म्हणून नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

सर्व माध्यमांच्या आणि सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये २२ जुलै ते ३० ऑगस्ट या कालावधीत 'महावाचन उत्सव २०२४' आयोजित करण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांची सदिच्छादूत म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भात आदेश काढला आहे.

वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. त्यामुळे गतवर्षी रीड इंडिया सेलिब्रेशन यांच्या सहकार्याने 'महाराष्ट्रातील वाचन चळवळ' हा उपक्रम राबविण्यात आला होता. यामध्ये मोठ्या संख्येनेविद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. याच संस्थेसोबत आता हा उपक्रम यावर्षीही राबविण्यात येणार आहे. यासाठी इयत्ता तिसरी ते पाचवी, सहावी ते आठवी आणि नववी ते बारावी अशी इयत्तानिहायची वर्गवारी निश्चित करण्यात आली आहे. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वाचन आवश्यक असून, यामुळे अभ्यासाच्या गतीत वाढ होते.



वाचनाच्या सवयीमुळे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात भर पडते. या सर्व गोष्टींचा विचार करून आणि सध्या वाचन संस्कृतीला बळ देण्याची गरज ओळखून हा उपक्रमराबविण्यात येणार आहे. जिल्हा आणि तालुकास्तरावर ग्रंथप्रदर्शने आयोजित केली जातील. सर्व शिक्षणाधिकाऱ्यांकडे याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रत्येक स्तरावर पहिल्या तीन विद्यार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे.

**या योजनेची उद्दिष्टे**

वाचन संस्कृतीला प्रोत्साहन, विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करणे, मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृतीशी विद्यार्थ्यांची नाळ जोडणे, दर्जेदार साहित्याचा व लेखक, साहित्यिकांचे विविध साहित्य, कथा, कवींचा विद्यार्थ्यांना परिचय करून देणे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणे, विद्यार्थ्यांच्या सृजन- शीलतेला व भाषा संवाद कौशल्य विकासाला चालना देणे.

# मी तुला आतून बाहेरून ओळखतो; स्वाभिमानीतून हकालपट्टी झाल्यानंतर तुपकरांचे टीकास्त्र

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३ पुणे**

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा प्रमुख आक्रमक चेहरा आणि राजू शेट्टी यांचे निकटवर्ती अशी ओळख असलेले रविकांत तुपकर यांच्यावर पक्ष संघटनेने मोठी कारवाई केली आहे. तुपकर यांची स्वाभिमानी शेतकरी संघटनेतून हकालपट्टी करण्यात आली. त्यानंतर आता रविकांत तुपकरांनी नाव न घेता शेट्टींवर टीका केली. मी तुला आतून बाहेरू ओळखतो, अशी टीका तुपकरांनी केली.



राजू शेट्टी आणि रविकांत तुपकर यांच्यात मतभेद असल्याच्या बातम्या आल्या होत्या. अखेर या मतभेदांनी टोक गाठलं आहे. तुपकरांची आज पक्षातून हकालपट्टी आली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष जालिंदर पाटील यांनी पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. या कारवाईनंतर रविकांत तुपकरांनी ट्विट एक ट्वीट केलं. त्यात त्यांनी लिहिलं की, संक्रमण होणार याची खूण ओळखतो, पावसाला अन् उन्हाला जून ओळखतो.

# केंद्र सरकारच्या योजनेच्या डीपीए खतांच्या बॅगेत निघाली माती : जिल्ह्यात विकल्या गेलीत 3300 बॅग

## पुण्यातील रामा फर्टिकेम कंपनीच्या अधिकाऱ्याविरोधात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

पुण्यातील रामा फर्टिकेम लि. नामक कंपनीने जिल्ह्यात ३ हजार ३०० बॅग डीएपी आणि १०:२६:२६ या महागड्या खतांच्या नावे शेतकऱ्यांना नत्र, स्फुरद व पोटॅश या घटकांच्या नावे अक्षरशः ४७ लाखांची माती विकली आहे. कंपनीची ही फसवेगिरी कृषी विभागानेच समोर आली आहे. या प्रकरणी सोमवारी रात्री शहर कोतवाली पोलिसांनी रामा फर्टिकेमचा जबाबदार अधिकारी विकास रघुनाथ नलावडे (४८, रा. श्रीगोंदा अहमदनगर) याच्याविरुद्ध फसवणुकीसह इतर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

खरीप हंगामाची पेरणी सुरू होताच बी बियाण्यांसोबतच रासायनिक खतांची मागणी शेतकऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यातही डीएपी, १०:२६:२६ या दोन्ही खतांना मोठी मागणी असते. त्यामुळेच या दोन्ही खतांची पेरणीच्या वेळी टंचाई राहते, दरम्यान शेतकऱ्यांच्या याच परिस्थितीचा फायदा रामा फर्टिकेम या खत उत्पादक कंपनीने घेतला. या कंपनीने जिल्ह्यात यंदा २० जूनपर्यंत २ हजार १०० बॅग १०:२६:२६ आणि १२०० बॅग डीएपीची विक्री केल्याचे कृषी विभागाने केलेल्या प्राथमिक चौकशीत समोर आले.




जिल्हा कृषी अधिकारी अजय तळेगावकर यांनी २० जूनला तिवसा तालुक्यातील मार्डा येथील नीलेश कृषी सेवा केंद्रातून नियमित तपासणीसाठी रासायनिक खताचे नमुने घेतले, त्यामध्ये रामा फर्टिकम लि. वडकी, पुणे या कंपनीने उत्पादित डीएपी खताचा नमुना घेतला आणि तो नमुना विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठवला. त्यानंतर २५ जूनला हे खत अप्रमाणित असल्याचे समोर आले.त्यामुळे कृषी अधीक्षक राहुल सातपुते यांच्या नेतृत्वात कृषी उपसंचालक उज्वल आगरकर तसेच कृषी विभागाने जिल्ह्यात कोठे कोठे या कंपनीचे खत विकले, याची माहिती घेतली. त्यावेळी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील मंगरूळ चव्हाळा येथील शुभम कृषी केंद्र येथे १०:२६:२६ हे खत असल्याचे माहीत झाले. कृषी विभागाने त्या ठिकाणी जाऊन नमुने घेतले आणि प्रयोगशाळेकडून तपासणी केली असता या खतांमध्येही आवश्यक घटक नगण्य प्रमाणात असल्याचे समोर आले. याच दरम्यान कृषी विभागाने रामा फर्टिकम या कंपनीचे डीएपी आणि १०:२६:२६ जिल्ह्यात कोणत्या वितरकाकडे आले, याबाबत माहिती घेतली. सदर कंपनीकडून डीएपी आणि १०:२६:२६ या खतांचा पुरवठा शहरातील मंदार ॲग्रो सर्व्हिसेस,जाफरजीन प्लॉट, अमरावती यांच्याकडेआल्याचे समोर आले. त्याआधारे कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी जिल्ह्यात कोणकोणत्या कृषीसेवा केंद्राला या खतांचा पुरवठा केला, याची माहिती घेतली असता सुमारे ३३०० बॅग डीएपी आणि १०:२६:२६ हे रामा फर्टिकेम कंपनीचे विक्री झाल्याचे लक्षात आले. डीएपी आणि १०:२६:२६ ही खते केंद्र सरकारच्या अनुदानाच्या श्रेणीत येत असल्यामुळे ते आवश्यक प्रणालीवरून विक्री करणे बंधनकारक होते. मात्र त्या प्रणालीवर पाहणी केली असता या कंपनीच्या खतांच्या विक्रीची नोंद नसल्याचे समोर आले. त्यामुळे २५ जूनलाच सदर कंपनीच्या खतांवर जिल्ह्यात विक्री बंद आदेश काढण्यात आला. तसेच ४५३ पोते साठा जप्त केला होता. याबाबत कंपनीला कृषी विभागाने खुलासा मागितला असता असमाधानकारक व मोघम उत्तर आले. त्यामुळे जिल्हा गुणवत्ता नियंत्रण अधिकारी सागर डोंगरे यांच्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी रामा फर्टिकेमच्या जबाबदार अधिकाऱ्याविरुद्ध गुन्हा वे दाखल करून तपास सुरू केला आहे. दरम्यान या कंपनीने जिल्ह्यात एकूण ४७ लाख ७ हजार रुपयांचे खत विकले आहे.

### केंद्र सरकारच्या योजनेचा ब्रँड

सदर कंपनीच्या खतांच्या बॅगवर 'प्रधानमंत्री भारतीय जन उर्वरक परियोजना' या केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या ब्रँडच्या नावाने छपाई करून विकले. त्यामुळे शासन व शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे.

### सखोल तपास करणार

शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याचे तक्रारीवरून समोर आले आहे. त्यामुळे आरोपीला अटक करणार. तसेच सखोल तपास करून गुन्ह्यात सहभागी प्रत्येकावर कठोर कारवाई करणार आहे.

**मनोहर कोटनाके, ठाणेदार, कोतवाली**

# घरीच बसूनच करता येईल बसचे तिकीट आरक्षित

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे ॲप उपलब्ध; प्रवाशांनो लाभ घ्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

रेल्वेप्रमाणे आता एसटी बसचे तिकीटही आरक्षित करता येत असून, त्यासाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळाने मोबाइल रिझर्व्हेशन ॲप व अधिकृत संकेतस्थळावरून ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. यासंदर्भात प्रवाशांत जागृती करण्याचे निर्देश विभागीय नियंत्रकांना देण्यात आले आहेत.

सर्वसामान्यांकडून एसटी बसच्या प्रवाशाला पसंती दिली जाते. परंतु, प्रवाशांच्या तुलनेत बसेसची संख्या अपुरी असल्याने अनेकवेळा उभे राहून प्रवास करावा लागतो, तर काहीवेळाप्रवाशांची संख्या एवढी असते की, बसमध्ये उभे राहायलाही जागा नसते. अशावेळी प्रवाशांची मोठी अडचण होते. राज्य मार्ग परिवहन महामंडळाने उपलब्ध करून दिलेले ॲप व अधिकृत संकेतस्थळावरून घरबसल्या तिकीट आरक्षित करता येते. त्यामुळे प्रवाशांनासोईचे झाले आहे. बहुतांश जण या योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून येत आहे.


### एमएसआरटीसी ॲपवरून करा तिकीट आरक्षित

एसटी महामंडळाच्या वतीने एमएसआरटीसी बस रिझर्व्हेशन ॲप उपलब्ध करून देण्यात आले आहे. या ॲपवरून प्रवाशांना घरबसल्या तिकीट आरक्षित करता येणार आहे. या सुविधेमुळे प्रवाशांची संख्या वाढण्यासही मदत होणार असल्याचे एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# पोलीस तक्रार प्राधिकरण ठरतोय पांढरा हत्ती?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३नागपूर**

पोलीस अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने सामान्य नागरिकांवर अन्याय-अत्याचार केला तर त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली. मात्र, राज्य आणि विभागीय स्तरावरील प्राधिकरणातील अर्धीअधिक पदे रिक्त असल्यामुळे प्राधिकरण पांढरा हत्ती ठरत आहे.




सामान्य नागरिक कायद्याच्या विरोधात वागल्यास त्यांच्याविरुद्ध पोलीस विभाग कारवाई करते. मात्र, जर पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यानेच कायद्याविरुद्ध वर्तन केल्यास त्याच्यावर कारवाई करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने राज्य व विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. राज्य स्तरावरील प्राधिकरणात उच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्यायमूर्तींची अध्यक्षपदावर तर अप्पर पोलीस महासंचालक पदावरून सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्याची सचिव पदावर नियुक्ती केली जाते. विभागीय प्राधिकरणात सेवानिवृत्त जिल्हा न्यायाधीश किंवा अप्पर पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक दर्जाच्या सेवानिवृत्त अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाते.

मुंबईत राज्यस्तरीय प्राधिकरण तर नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे येथे विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण आहेत. सध्या राज्य आणि विभागीय प्राधिकरणात निम्मी पदे रिक्त आहेत. परिणामी, पोलिसांकडून अन्याय-अत्याचार होऊनही सामान्य नागरिक न्यायापासून वंचित राहात आहेत. पोलीस कोठडीत मृत्यू, गंभीर दुखापत, बलात्कार, बेकायदेशीर अटक आणि भ्रष्टाचार करणाऱ्या पोलिसांविरुद्ध प्राधिकरणात दाद मागता येते. मात्र, पोलीस तक्रार प्राधिकरणच सध्या निष्क्रिय दिसत आहे.

# केंद्रीय अर्थसंकल्पाबाबत काय म्हणाले राजकीय नेते

## गरीब, शेतकरी, युवक व महिलांना समर्पित असलेला अर्थसंकल्प – डॉ. अनिल बोंडे



प्रधानमंत्री नरेंद्र जी मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिला अर्थसंकल्प अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज सादर केला. गरीब, शेतकरी, युवा व महिलांना समर्पित असलेला हा अर्थसंकल्प आहे. विकसित भारताच्या निर्माणाकरीता नऊ प्राधान्य यामध्ये विषद केले आहे. सर्वांना दिलासा देणारा आणि विकसित भारताचा अर्थसंकल्प निर्मला सितारामन यांनी मांडला असून या अर्थसंकल्पाचे स्वागत असल्याची प्रतिक्रिया राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिली.

## केंद्रीय अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली : आ. ॲड. ठाकुर



महाराष्ट्र राज्यातून सर्वात जास्त कराच्या रूपातून पैसा केंद्र सरकारला जात असताना त्याचा परतावा मात्र होताना दिसत नाही. केंद्र सरकारने आपल्या अर्थसंकल्पात महाराष्ट्राच्या तोंडाला पुन्हा एकदा पाने पुसली आहेत, अशी प्रतिक्रिया माजी मंत्री आणि आमदार ड.यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केली आहे. केंद्र सरकारने बिहार आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांना या अर्थसंकल्पात भरभरून तरतूद केली आहे. नितीश कुमार आणि चंद्राबाबू यांच्या उपकारांची परतफेड करताना महाराष्ट्रासारख्या राज्यांकडे मात्र पाठ फिरवली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचे एनडीएतील महत्त्व कमी झाले, त्यांची दखल घेतली जात नाही हे यावरून स्पष्ट होते. महिला आणि मुलींसाठी केंद्र सरकारने पुन्हा एकदा केवळ आभासी घोषणा केल्या आहेत

तरुणांना केवळ एक वर्षासाठी इंटर्नशिपचे गाजर दिले आहे, याने मूळ बेरोजगारीची समस्या कमी होणार नाही. असेही ड ठाकूर म्हणाल्या. केंद्र सरकारच्या या अर्थसंकल्पात काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील काही गोष्टी उचलल्या असल्याचे दिसते, मात्र काँग्रेसची विकासाची दृष्टी ही घेतली असती तर बरं झालं असतं. असा टोलाही ॲड. ठाकूर यांनी लगावला.

## सर्वसमावेशक, सर्वजनहिताय, सर्वजनसुखाय अर्थसंकल्प : चेतन गावंडे (माजी महापौर)



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विकसित भारताच्या संकल्पनेला अनुसरून विकसित भारताला चालना देणारा वर्ष २०२४-२५ च्या अर्थसंकल्पात सर्वसामान्यांना प्राधान्य देत त्यांच्या विकासासाठी पुरेशा संधी निर्माण करण्यासाठी नऊ बिंदूच्या प्राधान्यक्रमांकवर भर देण्यात आला आहे . शेतीमध्ये उत्पादकता आणि लवचिकपणा , रोजगार आणि कौशल्ये, सर्वसमावेशक मनुष्यबळ विकास आणि सामाजिक न्याय , उत्पादन आणि सेवा , शहरी विकास, नागरी विकास , ऊर्जा सुरक्षा , पायाभूत सुविधा , नवोपक्रम, संशोधन आणि विकास , पुढच्या पिढीसाठी सुधारणा इ बाबाचा अंतर्भाव करण्यात आला .

केंद्रीय अर्थमंत्री श्रीमती निर्मला सीतारमन यांनी सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प हा सर्वसमावेशक आणि प्रगतीशील असून यात युवा, शेतकरी, दुर्बल, महिला अशा विविध घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. हा अर्थसंकल्प एक नवीन इतिहास तयार करणारा आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं विकसित भारताचं स्वप्न साकारण्याच्या आणि गरिबकल्याणाचा उद्देश साध्य करण्याच्या दिशेने जाणारा हा अर्थसंकल्प भारतातील जनतेच्या आशा-आकांक्षांना बळ देणारा आहे. सर्वसमावेशक अर्थसंकल्पाबद्दल सरकारचे अभिनंदन !

## करदात्यांची निराशा करणारा अर्थसंकल्प



देशातील एनडीए सरकार अर्थसंकल्पातुन कर रचनेत मोठे बदल करणार अशी अपेक्षा करदात्यांना होती. पण केवळ त्रुटक बदल करीत तोंडाला पाणी पुसण्याचा प्रयत्न करण्यात आला असून १५ लाखाच्या वर उत्पन्न असणाऱ्या करदात्यांना कुठलाही रिलीफ देण्यात आला नाही. मुद्रा लोनची मर्यादा वाढविणे, बेरोजगार युवकांना स्टायफंड अश्या विविध घोषणा अर्थसंकल्पातून करण्यात आल्या असल्या तरी एकंदरीत करदात्यांचा निराशा करणारा हा अर्थसंकल्प आहे

**अमोल चवणें (पासपोर्ट)उद्योजक अमरावती**


## अर्थसंकल्पात महाराष्ट्राकडे दुर्लक्ष



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार अर्थसंकल्पात महाराष्ट्रासाठी भरीव तरतूद करेल अशी आशा होती .परंतु ती आशा फोल ठरली आहे. बिहार आणि आंध्र प्रदेशसाठी अर्थसंकल्पात मोठे पॅकेज जाहीर करण्यात आले. पण त्या तुलनेत महाराष्ट्राकडे दुर्लक्ष करण्यात आले असून केवळ मन लुभावन असा घोषणा करण्याचा फार्स केंद्र सरकारने अर्थसंकल्पात केल्याचे दिसून येते .सर्वसामान्य नागरिक व शेतकऱ्यांना प्रत्यक्ष फायदा मिळेल अशी कुठलीही घोषणा करण्यात आली नाही .शेतकरी, उद्योग, शिक्षण, रोजगार आदी क्षेत्रांसाठी कोटीची उडाने करणारे आकडे अर्थसंकल्पात मांडण्यात आले असले तरी प्रत्यक्षात त्याचा फायदा मिळण्याची शक्यता नाही.

**सुनील खराटे शिवसेना जिल्हाप्रमुख ,अमरावती**

## देशाला वेगवान बनविणारा अर्थसंकल्प– निवेदिता चौधरी



कोरोनामुळे जगातील अनेक प्रगत देशांच्या अर्थवव्यवस्थेचा विकास दर माघारला असतांना देशाच्या अर्थव्यवस्थेने ८.२ टक्के वाढ दाखविली आहे. देशाला वेगवान बनविणारा अर्थसंकल्प आहे.केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात तरुणांना इंटर्नशिप, महिला आणि मुलींसाठी: महिला आणि मुलींना लाभ देणाऱ्या योजनांसाठी ३ लाख कोटी रुपयांची तरतूद. ज्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळत नाही त्यांना देशभरातील संस्थांमध्ये प्रवेशासाठी कर्ज मिळेल. सरकार कर्जाच्या ३ टक्के रक्कम देईल. यासाठी ई-व्हाऊचर सुरू केले जातील, जे दरवर्षी एक लाख विद्यार्थ्यांना दिले जातील.आयकर स्लॅबमध्ये बदल केले आहे.शेतकरी,कष्टकरी यांच्यासह सर्वानाच फायदेशिर ठरणारा हा केंद्रिय अर्थसंकल्प आहे.

# 'त्या' अधिकाऱ्यांच्या घटनाबाह्य कारभाराकडे मंत्र्यांचे दुर्लक्ष, माजी आमदार बी.टी. देशमुख

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२३अमरावती**

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार राज्यकारभाराच्या विषयांबाबत विधिविधान तयार करण्याचा अधिकार हा राज्याच्या मंत्रिमंडळाचा अधिकार आहे. 'घटनेत विधिवत दुरुस्ती' न करता 'घरगुती पद्धतीने घटनादुरुस्त' करून आम्ही हा अधिकार वापरू शकतो, असा पोरकटपणाचा हट्ट उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी धरला आहे. या विभागातील अधिकाऱ्यांनी हा जो घटनाबाह्य धुडगूस घातलेला आहे, तो थांबविण्यासाठी उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी कोणतीही कृती केली नाही, अशी टीका माजी विधान परिषद सदस्य आणि महाराष्ट्र प्राध्यापक संघाचे माजी अध्यक्ष प्रा. बी.टी. देशमुख यांनी केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लिहिलेल्या पत्रातून प्रा. बी.टी. देशमुख यांनी उच्च शिक्षण विभागातील अनागोंदी कारभाराचा पाढाच वाचला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे व संविधानातील तरतुदीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाच्या रेग्युलेशनसशी राज्यशासनाचा कायदा किंवा शासननिर्णय विसंगत असू शकत नाही ही भूमिका राज्यपालांनी, मुख्यमंत्र्यांनी व मंत्रिमंडळाने मान्य केलेली असून त्याप्रमाणे राज्याच्या कायद्यात दुरुस्त्या केलेल्या आहेत. मात्र उच्च शिक्षण विभागातील अधिकारी ही भूमिका मान्य करायला तयार नसल्यामुळे शासन निर्णयातील विसंगत तरतुदी अजूनही जिवंत आहेत. 'घरगुती पद्धतीने घटनाबदल' करून आपल्याला संविधानातील कलम २५४ चा भंग करता येतो व असे करताना सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करण्याचा आपल्याला अधिकार आहे असे उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी गृहित धरले आहे, असे प्रा. बी.टी. देशमुख यांनी म्हटले आहे.आज ९० टक्के जागा कायम तत्वावर भरल्याच पाहिजेत, हा विद्यापीठ अनुदान आयोगाचा नियम ही सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेली कायद्याची अंतिम सुस्थापित स्थिती आहे. रेग्यूलेशनने ठरवून दिल्याप्रमाणेच त्या कंत्राटी शिक्षकांना वेतन देण्यात यावे, तसे न करणे हे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात आहे, याकडे बी.टी.देशमुख यांनी लक्ष वेधले आहे.



भारतीय संविधानाबाबत अशा पोरकट कल्पना मनाशी बाळगणाऱ्या अधिकाऱ्यांच्या एका पिढीला उच्च शिक्षणक्षेत्रामध्ये शिक्षक व शिक्षकेतर पदासाठीची उच्च गुणवत्ता धारण करणाऱ्या युवकांच्या अनेक पिढ्या बरबाद करण्याचा कोणताही अधिकार नाही. मागासवर्गीयांचा तिरस्कार करणाऱ्या उच्च शिक्षण विभागातील काही अधिकाऱ्यांनी उत्तम गुणवत्ता प्राप्त मागासवर्गीय तरुणांना आरक्षणाच्या मार्गाने किंवा गुणवत्तेच्या मार्गाने या क्षेत्रात येण्यापासून वंचित ठेवण्यासाठी संविधानातील कलम २५४ चा भंग करण्याच्या व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाची अवहेलना करण्याच्या मार्गाची निवड केली आहे, अशी टीका बी.टी. देशमुख यांनी केली आहे.